2019-20
Jan 20

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

(4)

## Peer-Reviewed Indexed
## Multidisciplinary International Research Journal

**January-2020**
**SPECIAL ISSUE-CCIII**

# Bhartiya Vicharvant,Humanities



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari -
Deptt. of Economics,
G.S.Tompe
Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Aadhar Publications**

Scanned with CamSca

Impact Factor – 7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

***Multidisciplinary International Research Journal***

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

January -2020

SPECIAL ISSUE - CCIII

## Bhartiya Vicharvant , Humanities



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari -
Deptt. of Economics,
G.S.Tompe
Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamSca

ISSN : 2278-9308
January 2020


| | | |
|---|---|---|
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा — आकाश शेषराव बांगर | 88 |
| 24 | लोकनायक बापूजी अणे यांच्या नेतृत्वातील विदर्भातील जंगल सत्याग्रह — एक आलोचनात्मक अभ्यास — कु. वर्षा शं. काटेखाये | 91 |
| 25 | भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुदृढतेसाठी बुद्धाच्या आर्थिक विचारांची आवश्यकता — प्रा. डॉ. मोहन दे. वानखडे | 95 |
| 26 | भारतीय जागतीकरणाचा कृषी व्यवसायावर होणारा परिणाम — विणा एस काकडे | 99 |
| 27 | भारतातील ग्रामीण दारिद्रय निर्मूलन एक दृष्टीक्षेप — प्रा. डॉ. अे. जी. वानखडे | 104 |
| 28 | कर्मचारी भविष्य निधी संघठन योजना — प्रा. डॉ. कु. ताई बा. उके | 107 |
| 29 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आगामी काळातील आव्हाने — डॉ. वर्षा गंगणे | 110 |
| 30 | ग्रामीण दारिद्रय आणि दारिद्रय निर्मूलन — प्रा. डॉ. संजय पी. पिठाडे | 117 |
| 31 | जागतिक दहशतवाद - कारणे आणि उपाय — डॉ. प्रा. अश्विनी अविनाश खापरे | 121 |
| 32 | सेवा क्षेत्रावर पर्यावरणातील घटकांचा होणारा परीणाम — डॉ. अनिल श्री. खांडेकर | 123 |
| 33 | उस्मानाबाद तालुक्यातील साक्षरता एक भौगोलीक अभ्यास — प्रा.चव्हाण अे.डी. /डॉ.गुळवे एम.एन | 129 |
| 34 | प्राचीन व मध्ययुगीन काळातील मराठी साहित्य व कृषिअर्थव्यवस्था — डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 133 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री दास्य विरोधी कार्य — डॉ. सिद्धार्थ एन. बुटले | 138 |
| 36 | वृध्दापकाळः वर्तमान समाज जीवनातील आव्हाणे व उपाययोजना — डॉ. धनराज चौखुंडे | 141 |
| 37 | भंडारा तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील २०१९ वर्षाचा इयत्ता १०वी गणित विषयाच्या निकालाचा तुलनात्मक अभ्यास. — पांडुरंग टिकाराम कोळवते / डॉ. अमोल मांडेकर | 143 |
| 38 | विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक दृष्टिकोन — डॉ. प्रज्ञा जुनघरे | 150 |
| 39 | बुध्दकालीन औशधविज्ञान : भेसज्जखन्धक — डॉ.मनोहर तुळशीराम कुंभारे | 153 |
| 40 | भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री सक्षमीकरण विषयक विचाराचे व कार्याचे योगदान — प्रा.डॉ.प्रशांत वामनराव खेडकर | 159 |
| 41 | महात्मा जोतीराव फुले यांचे महिला विषयक विचार — डॉ. ज्योती शेषराव दिघाडे | 162 |
| 42 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सामाजिक सुधारणा विषयक विचार — डॉ. किशोर उत्तमराव राऊत | 164 |




Scanned with CamScanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - (SJIF) – 7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
January 2020

# प्राचीन व मध्ययुगीन काळातील मराठी साहित्य व कृषिअर्थव्यवस्था

डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन महाविद्यालय चिखली,जि.बुलडाणा. पिन नं – ४४३२०१

१.प्रस्तावना :–

मानव हा समाजशील प्राणी आहे.त्याने विकासावस्थेमध्ये विविध गरजा भागविण्यासाठी व शंत्रुपासून सरंक्षण करण्यासाठी संघटित वस्त्यांमध्ये राहणे पसंत केले. प्राचीन काळात भटक्या अवस्थेत असतांना मानवाला शेतीचा शोध लागला आणि तेव्हापासूनच स्थीरवस्त्या आणि समुदाय खेडयांच्या रूपाने उदयास आले. म्हणजेच मानव आपली भटकी अवस्था सोडून स्थिर शेती करू लागला तेंव्हा प्राचीन खेडी अस्तित्वात आलीत. याचा अर्थ कृषिव्यस्थेतूनच खेडी उदयाला आली. भारत प्राचीन काळापासून व आजही खेडयांचाच देश आहे. शेती व्यवसाय हा खेडयांचा आत्मा आहे. भारतातील बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय शेतीच असल्यामुळे भारत आजही कृषिप्रधान देश समजल्या जातो. आजही खेडयातील व्यवसाय, एकंदर जीवन आणि संस्कृतीवरही शेतीचाच प्रभाव दिसून येतो. ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था शेतीभोवतीच फिरत असते. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात यांत्रिकीकरणामुळे कृषिअर्थव्यवस्थेत प्रचंड बदल झालेत. मात्र प्राचीन काळापासून ते इंग्रज आगमनापर्यंत कृषिअर्थव्यवस्थेचे स्वरूप कसे होते,व त्याचे प्रतिबिंब तत्कालीन साहित्यात पडत होते का यावर एक दृष्टिक्षेप टाकणे हा या शोधनिंबधाचा हेतू आहे.

२.आरंभ ते १२ वे शतक आणि मराठी साहित्य :–

प्रगतावस्थेमध्ये मानवाने शेतीचा शोध लावला व हळूहळू बदलती शेती सोडून स्थिर शेती तो करू लागला. खेडयांचा उदय झाला व तो स्थिरस्थावर जीवन जगू लागला. ' निर्वाहासाठी सहेतूकपणे जमिनीतून पिके काढणे म्हणजेच कृषी असा अर्थ केला तर शेतीचा इतिहास इ.स.पूर्व आठ ते दहा हजार वर्षपिक्षा अधिक जूना नाही'[१] यावरून शेतीचा उदयकाल हा दहा हजार वर्षे एवढा प्राचीन असल्याचे स्पष्ट होते. मानवाच्या प्रगतावस्थेत शेतीचा शोध एक महत्वाचा टप्पा, क्रांतीकारी टप्पा मानावा लागतो. कारण या शेतीतूनच भारतीय ग्रामीण संस्कृती उदयास आली. पुढे त्यातूनच कृषिअर्थव्यवस्थेचा विकास होत होत आजचा टप्पा तीने गाठला आहे.

भारतीय संस्कृतीचा इतिहास ऋग्वेदकाळापासून आपणास ज्ञात आहे. ऋग्वेदकाळात मानवसमूह शेतीसाठी एका जागी स्थिरावले होते. तेंव्हाचा समाज शेती आणि पशुपालन यावरच आपली गुजरान करीत असे. जंगले तोडून भूमी पेरणी योग्य केल्या जात असे. ' शेती केवळ पावसावर अवलंबून नव्हती तर विहिरीतील पाण्याचाही उपयोग शेतीसाठी करण्यात येत असे'[२] यावरून शेती बरीच प्रगत झाली होती असे निदर्शनास येते. शेतकऱ्यांना सूत, कर्मकार, शिल्पी इत्यादींची मदत होत असे. उत्तर वैदिक काळातही कृषिव्यवस्था प्रगतच होत होती. बारा बैलांचा नांगर, शेतीसाठी खते, शेती करणाऱ्या शेतकऱ्यांबरोबर शेतीस सहाय्यक ठरणाऱ्या इतरांचा उल्लेख, परेणी–मळणी इत्यादींचे संदर्भ दिसून येतात. यावरून ' या काळात जीवनाचा मुख्य आधार ' शेती ' हाच असला व ग्रामजीवनाला राज्य व अन्य व्यवस्थांमध्ये महत्वाचे स्थान असले तरी मौर्य अथवा कौटिल्याचा काळ हा ग्रामीण समाज जीवनाच्या दृष्टीने अधिक स्थैर्याचा, सुरक्षित, समृध्द व संपन्नतेचा काळ मानावा लागतो.[३]

इसवीसनाच्या आरंभापासून तर सहाव्या – सातव्या शतकापर्यंतचे ग्रामीण जीवन राजा हाल च्या ' गाथासप्तशती ' मधून प्रकटते. या ग्रंथात शेत, शेतकरी व शेतकीविषयी विपूल माहिती मिळते. शेताचे रक्षण करणारे आहिर, खाटीक, न्हावी, भोईण, सोनार, माळीण, वेश्या इत्यादी व्यवसाय करणारा वर्ग समाजात दिसून येतो.मुख्य नगरात बाजार भरत असे. बाजारात आजूबाजूच्या खेडयातील व वन्य लाक बाजारासाठी येत असत. ' नागरी राहणीमानाला चटावलेल्या नागरकारांना ग्रामीण जीवन घृणास्पद वाटू



Scanned with CamSca

लागलेलेही दिसून येते.[४] बहुतांश शेतकऱ्यांची परिस्थिती हलाखीची दिसून येते. गाथा सप्तशतीमधून एक शेतकरी असा दिसून येतो की, तो एवढा दरिद्री आहे की, बैल खरेदी करण्यासाठी त्याला पांघरणे विकावी लागतात. तांदुळ, कपाशी, तूर, मोहरी, ताग, काकडी, चने, ऊस, गुळ इत्यादी पिकांचे उल्लेख येतात. गाथा सप्तशतीतील इत्यादी उल्लेख तत्कालीन अर्थव्यवस्था कृषिकेंद्रित असल्याचे दर्शवितात.

शेतकरी व शेतीची अवस्था उत्तरोत्तर दयनीय होत गेलेली निदर्शनास येते. सरंजामशाही, जमीनदारी पध्दत हळूहळू विकसीत होऊन इसवीसनाच्या ५–६ व्या शतकानंतर या प्रवृत्तीने शेती, शेतकरी व पर्यायाने एकूणच ग्रामीण समाजाचे शोषण करण्यास आरंभ केलेला दिसतो. भूमी, गावेच्या गावे दान देण्याच्या प्रथा निर्माण झाल्या. ज्यांनी गावे दान घेतली ते जबरीने करवसूली करतांना दिसून येतात. ' एकटया राष्ट्रकुट घराण्यातील दोन राजांनी १६०० गावे दान दिली. ती देतांना गावकऱ्यांची संमतीच काय, पण त्यांना सुचनाही दिलेली दिसत नाही.[५]

इ.स.नाच्या ६ व्या शतकापासून तर १०–११ व्या शतकापर्यंतची कृषि–अर्थव्यवस्थेबद्दलची माहिती 'कृषिपराशर', 'शुकनिती' व 'मानसार' या ग्रंथामधून उपलब्ध होते. एकूणच इ.स.नाच्या आरंभापासून ते १२ व्या शतकापर्यंतच्या या कालखंडाचा विचार केल्यास तत्पूर्वीच्या काळात ग्रामीण समाजाची आढळणारी संपन्नता, समृध्दता, हळूहळू या काळात लोप पावून सरंजामी व जमीनदारी वृत्तीने ग्रामीण समाज व शेतकऱ्यांचे शोषण करण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसते. या काळात शेतकऱ्यांची गणना शुद्रात केल्या गेलेली दिसते. ' सरंजामशाहीचा उदय जमीनदारी पध्दती या काळातच अधिक विकसित झाली. त्यामुळे ग्रामीण समाजाच्या सर्वांगिण शोषणाला आरंभ झाला. असे असले तरी या काळातही शेतीचे महत्व कमी झालेले आढळत नाही. पूर्वीएवढी प्रतिष्ठा ' शेतीला ' नसली तरी राजकोषाच्या वाढीसाठी तिचा प्राधान्याने विचार या काळातही झालेला दिसतो.[६] यावरून १२ व्या शतकापर्यंत अर्थव्यवस्था ही कृषिकेंद्रितच होती व राजकोषामध्येही शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचाच मोठया प्रमाणात वाटा असे.

**३.यादवकालीन कृषिअर्थव्यवस्था आणि मराठी साहित्य :—**

महाराष्ट्राचा ज्ञात इतिहास इ.स.पूर्वीपासून माहिती असला तरी मराठी भाषेच्या अस्तित्वाचे पुरावे अस्तित्वाचे पुरावे इ.स.४०० पासून आढळतात. याच मराठी भाषेत ११–१२ व्या शतकात समृध्द अशी ग्रंथपरंपरा निर्माण झालेली दिसते. या समृध्द गंथसंपदेतून त्या काळातील महाराष्ट्रीयन ग्रामीण समाजजीवनाचे व कृषिअर्थव्यवस्थेचे स्वरूप समजून घेता येते. 'ज्ञानेश्वरी' व 'लिळाचरित्र' हे या काळातील मराठी साहित्यातील महत्वाचे ग्रंथ. यामधून त्या काळातील ग्रामीण जीवन, शेती यांचे संदर्भ विषयानुरोधाने आलेले दिसतात.

'लिळाचरित्र' हा चक्रधरांचा चरित्रग्रंथ असल्यामुळे व चक्रधरांनी त्या काळात महाराष्ट्रभर खेडयापाडयातून भ्रमंती केलेली असल्यामुळे 'लिळाचरित्रा'तून कृषिजीवनाचे बरेच दाखले मिळतात. शेती लोकांचा मुख्यव्यवसाय यादवकाळातही होता. शेती बरोबरच इतरही व्यवसाय हलवाई, घोडयाचे व्यापारी, विणकर, वाणी, बडवे, पुजारी, गुरव, माळी, पुराणिक, न्हावी, तराळ, जागल्या, पाटील, महाजन, कुंभार, हमाल, भिक्षेकरी, कुणबी, शेतकरी, शिंपी, सैनिक, भाट, भोई, लाकूडतोडे, कोळी असे कितीतरी सेवेकरी व व्यावसायिकांचा उल्लेख 'लिळाचरित्रातून' आलेला आहे.'ज्ञानेश्वरी' या ग्रंथातूनही तत्कालीन कृषिजीवनाचे अशाच प्रकारचे वर्णन आलेले आहे. शेतकरी, सेवेकरी व व्यावसायिक यांच्या आपसी सहकार्यातूनच वस्तुविनिमयाच्या रूपाने कृषिअर्थव्यवस्था उभी होती.

यादवकालीन ग्रामीण जीवनाचे व कृषिव्यवस्थेचे वरील संदर्भ हे पूर्वीच्या भारतीय परंपरेशी मिळते जुळतेच आहेत. गावाच्या कारभारासह सारा वसुलीचे काम पाटील बघत असे. कुंभार, सुतार, लोहार, न्हावी व परीट हे पाच बलुतेदार ग्रामीण जीवनाच्या संदर्भात महत्वाचे मानले जात असत. बलुतेदार प्रत्येक गावी होते. 'यादवकाळात तर १८ बलुतेदारांचा उल्लेख येतो'[७] बहुतेक बलुतेदाराला वस्तुरूपाने धान्य वगैरे वतन असे. ग्रामीण भागात वाणी किंवा व्यापारी महत्वाचा घटक होता. प्रत्येक गाव स्वावलंबी असले तरी



Scanned with CamScanner

मीठ, कापड, यासारख्या वस्तू बाहेरून आणाव्या लागत असत. त्यासाठी आठवड्याला एखाद्या मोठया खेड्यात बाजार भरत असे. तिथे वस्तुविनिमयाने किंवा काही नगदी स्वरूपात आर्थिक उलाढाल होत असे. व्यापारी वर्ग सावकारकी करतांनाही दिसून येतो. गहान म्हणून अडकित्ता किंवा शेतीची पाटी इत्यादी द्यावी लागे. मजुरांना स्वकष्टाने पिकविलेल्या शेतीत उत्पनाचा १० वा भाग मिळत असे. मात्र मलिक अंबरच्या काळात शेतीवरील कर उत्पन्नाच्या २० टक्के असे. मात्र अतिवृष्टी–अनावृष्टी झाल्यास हे कराचे प्रमाण कमी जास्त केल्या जात असे.

यादवानंतर महाराष्ट्रात मुस्लीमांचे राज्य आले. रयतेवर सर्वच बाजुंनी जुलुम जबरदस्ती होऊ लागली. त्यामुळे ग्रामीण भाग अक्षरश: भरडून निघत असे. अशा आक्रमणामुळे मात्र प्राचीन काळापासुन अस्तित्वात असलेल्या ग्रामीण भागातील व्यवस्था फारशा बदलल्या नाहीत. १० व्या ते १५ व्या शतकापर्यंत अनेक संकटे झेलूनही ग्रामीण समाजव्यवहार अविचल राहिला.

**४. शिवकालीन कृषिअर्थव्यवस्था आणि मराठी साहित्य :–**

इ.स.१३१८ मध्ये हरपाळदेवांचा कुतुबुद्दीन शहाने पराभव केला व महाराष्ट्रावर परधर्मीय लोकांची सत्ता स्थापित झाली. पुढे जवळपास २५० वर्षे महाराष्ट्रीयन जीवन मुस्लीम राजांच्या अत्याचारामुळे अस्थीर व दयनीय झाले. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात. 'वैश्यवर्ग नागवला गेला आणि शेटे, महाजन हे नाव मात्र राहिले. महाराष्ट्रातून वैश्य वर्ग, अजिबात नाहीसा झाला. अतिशुद्रांपैकी खाटीक, तांबोळी, रंगारी, चांडाळ हे लोक स्वत:हून मुसलमान झाले.'[८] इ.स.१६४४ नंतर स्वराज्य स्थापनेचे शिवाजी महाराजांनी प्रयत्न केले व १६७४ मध्ये स्वराज्यस्थापनेनंतर राज्याभिषेकही केला. शिवकालीन ग्रामीण समाजाचे स्वरूप व त्यांच्या आर्थिक स्थितीची कल्पना बखरी, तुकारामाची गाथा, रामदासांचे ग्रंथ तथा ऐतिहासिक कागदपत्रांवरून येते.

संत तुकाराम स्वत: कुणबी होते. त्यांनी शेती व व्यापार दोन्ही केल्यामुळे त्यांचे अनुभवांचे विश्व अस्सल ग्रामीण होते. या काळात सुध्दा गावातील जवळपास सर्वच लोकांचा व्यवसाय शेती व पशुपालन हाच होता.गावात पूर्वीप्रमाणेच विभिन्न जातींचे व व्यावसायिक लोक राहत. तेली, कोळी, न्हावी, मोळीविके, हमाल, बहुरूपी, खाटीक, फासेपारधी, परीट, गवळी, गोपाल, पुराणिक, साळी, कोष्टी, कुंभार, वैद्य, सोनार, मजूर, दासदासी, गारूडी, धनगर, चांभार इत्यादी अठरापगड जाती जमातींच्या व्यवसायांचा उल्लेख संत तुकारामांच्या अभंगातून येतो. हे सर्व कारूनारू, शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण, समाजजीवनाचे व अर्थव्यवस्थेचे महत्वाचे घटक होते. परकीय सततच्या आक्रमणामुळे जनता धास्तावलेली होती. जे थोडेफार धन असेल ते घरात पुरून ठेवल्या जात असे. दुष्काळामुळे तर ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडली. स्वत: तुकाराम एका अंभगात म्हणतात.

'दुष्काळे आटिले द्रव्य नेला मान !
स्त्री एकी अन्न अन्न करीता मेली !'

म्हणजे दुष्काळमुळे तुकारामसारख्याची ही अवस्था झाली. पाटील, कुळकर्णीसारख्या अधिकारी वर्गाची अवस्थाही अत्यंत हलाखिची झाली तर सर्वसामान्य गावकऱ्यांची, शेतकऱ्यांची स्थिती कशी असेल? या दुष्काळाच्या जोडीला शत्रुंची आक्रमणे, लुटालुट यामुळे गावेच्या गावे उध्दस्त व उजाड झाली होती. शिवाजी महाराजांची सत्ता स्थापण झाल्यानंतर मात्र त्यांनी ग्रामीण भाग व तेथे राहणाऱ्या शेतकरी वर्गाची पुर्नउभरणी करण्याचेच काम केले. जास्तीत जास्त शेती लागवडीखाली आली पाहीजे. तिच्यातून अधिक उत्पन्न आले पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्याला सरकारकडुन शक्य तेवढे सहाय्य देण्याचे धोरण त्यांनी आखले. त्यांच्या एका पत्रात ते म्हणतात. 'ज्यास सेत करावयास कुवत आहे आणि त्याला जोतास बैल, पोटास दाणा नाही, त्यावीन तो आडेन, निकामी झाला असेल तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दो चौ बैलांचे पैके द्यावे. बैलाचे पैके वाढी दिढी न करीता मुदलच उसनेच हळूहळू याचे तवानगी माफिक घेत येत उसूल घ्यावा'[९] यावरून शेतीचा विकास व्हावा त्यातून कृषिअर्थव्यवस्था विकास पावावी व शेतकरी


Scanned with CamScanner

सुखी व्हावा याविषयी त्यांची तळमळ दिसून येते. आपल्या सैनिक व अधिकाऱ्यांनीही रयतेला त्रास देऊ नये व शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करावे असे आदेश त्यांनी दिले. या उपाययोजनांमुळे तरी दुष्काळ व लढायामुळे उजाड होऊ पाहणारी गावे पुन्हा आपल्या पायावर पूर्ववैभवाने उभी राहतील असाच त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे शेती, शेतकरी व इतरही ग्रामीणांची घडी निटपणे उभी राहिली व विकास पावली. याचे चित्रण तत्कालिन बखरी,पोवाडे व संत साहित्य यातुन बघावयास मिळते.

५. पेशवाईचा काळ आणि मराठी साहित्य :—

साधरणत: १७१९ ते १८१८ हा पेशवाईचा कालखंड आहे. या काळात अनेक पेशवे झाले व मराठयांचा भारतभर दबदबाही निर्माण झाला. लष्करात सततच्या लढायामुळे शिपाईगिरीची कामे मोठयाप्रमाणात मिळू लागली.'शेतीची कामे संपली की तलवार हातात घेऊन शिपाईगिरी करणारे तसेच कायम शिपाईगिरीचा पेशा करणारी माणसे किंबहुना काही पिढया या काळात निर्माण झाल्या'[१०] त्यासोबतच लष्करासाठी लागणारे इतर सरदार, सुभेदार, कारकुन हे सुध्दा ग्रामीण भागातून आल्यामुळे शेतीवरील माणसांचे ओझे थोडे कमी झाले होते. त्यामुळे ग्रामीण भागात आर्थिक समृध्दता निर्माण झाल्याचे चित्र काही काळ दिसले. मात्र सततच्या लढायांमुळे अस्थिरता ही कायमच होती, कारण मराठा सैन्य ज्या गावाजवळून जाईल ती गावे एक प्रकारे उद्ध्वस्तच होत असत. ' मोगल हे परकीय होते त्यांनी असे करणे एकवेळ समजून घेता येईल. परंतु शत्रुप्रमाणेच आपले स्वकीयही असेच करीत. धारचे सरदार तुकोजीराव पवार यांनी खुद्द शाहू महाराजांचाच फड कापून नेला. तेंव्हा सामन्य जनतेची, खेडयांची, शेतांची अवस्था काय असेल? केवळ फौज येणार एवढे जरी कळले तरी सगळी गावपंढरी परागंदा होत असे'[११] यावरून शासनव्यवस्था व राज्याची अर्थव्यवस्था कृषिक्षेत्रावरच आधारलेली असल्यामुळे दंडशक्तीच्या जोरावर शेती व शेतकऱ्यांचे शोषण मोठया प्रमाणात या काळात होऊ लागले होते.

कृषिव्यवस्थेत अलुतेदार—बलुतेदार यांचे महत्वाचे स्थान याही काळात होते. शेतीच्या व शेतकऱ्यांच्या गरजा त्यांच्यामार्फत वस्तुविनिमय पध्दतीने भागविल्या जात असत. चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी इत्यादी बलुतेदार आणि तेली, तांबोळी, साळी, धनगर, शिंपी, गोंधळी, डौरी, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाणी वाजंत्री, तराळ, भोई इत्यादी अलुतेदार ग्रामीण व्यवहारात महत्वाची भूमिका बजावित असत. शेती महत्वाची असल्यामुळे तिचे उत्पन्न वाढावे यासाठी काही सरकारांनी जाणीवपूर्वक प्रयत्नही केलेले दिसतात. बंधारे, पाट, यांच्या दुरूस्तीसाठी मदत करणे, पडीक जमीन लागवडीखाली आणतांना काही काळ शेतसारा माफ करणे, जातिवंत जनावरांची पैदास इत्यादी प्रयत्नांमुळे शेतीमध्ये काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे जाणवते. पेशवाई अखेर मात्र ग्रामीणच नव्हे तर एकूणच मराठी समाजात अंदाधुंदी निर्माण झाली. त्यामुळे या काळाच्या अखेरीस ग्रामीण समाजाची अवस्था परत दयनीय झाल्याचे आढळते.

निष्कर्ष :—

अशाप्रकारे वेदकाळापासून तर पेशवाईच्या अखेरपर्यंत कृषिअर्थव्यवस्थेत फारसे परिवर्तन झाल्याचे आढळत नाही. थोडे फार फरक जरी जाणवत असले तरी शेतीचे प्रश्न कायमच जसेच्या तसेच होते. या प्रदिर्घ कालावधीत राज्यकर्ते बदलले तरी शेती करण्याची पारंपारिक पध्दत जशीच्या तशीच होती. त्यामुळे कृषिव्यवस्थेत या प्रदीर्घ कालखंडात फार असे बदल झालेच नाहीत.



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
January 2020

संदर्भ ग्रंथ
१) देशमुख गणेश,'ग्रामीण समाजजीवन व साहित्य,'स्वरूप प्रकाशन २००८,पृष्ठ क. २०.
२) तत्रैव, पृष्ठ क.३९.
३) तत्रैव, पृष्ठ क.७४.
४) तत्रैव, पृष्ठ क.८१.
५) शर्मा रामशरण,'भारतीय सामंतवाद', दिल्ली,१९९३,पृष्ठ क. १०२.
६) देशमुख गणेश, उनि, पृष्ठ क.१७०.
७) तत्रैव, पृष्ठ क.११०.
८) शहा मु.ब,'इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य,'धुळे १९९८,खंड—७,पृष्ठ क.९९.
९) कुळकर्णी अ.रा.'शिवकालीन महाराष्ट्र,'पुणे, १९९३,पृष्ठ क ५२ — ५३.
१०) देशमुख गणेश ,उनि, पृष्ठ क १३९.
११) तत्रैव, पृष्ठ क १४१.



Scanned with CamSca

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA






Volume - IX, Issue - II,
April - June – 2020
Marathi Part - I



Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | राष्ट्रसंतांचे मानवतावादी युगदृष्टेपण !<br>**प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. बन्सोड** | ६९-७४ |
| १६ | वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा शैक्षणिक दृष्टीकोन<br>**प्रा. डॉ. प्रमोद मनोहर बोधाने** | ७५-७७ |
| १७ | ग्रामगीतेतील कल्याणकारी अर्थशास्त्र काळाची गरज<br>**डॉ. पी. एस. चंगोले** | ७८-९० |
| १८ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिप्रेत असलेला ग्रामआरोग्य<br>**प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार** | ९१-९३ |
| १९ | जनक्रांतीचे शिल्पकार तुकडोजी महाराज<br>**डॉ. संजय गो. ठवळे** | ९४-९८ |
| २० | माणिक बंडूजी ब्रहमभट्ट ते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महराज:एक जीवन प्रवास<br>**शेख समरीन बेगम इब्राहिम** | ९९-१०७ |
| २१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील ग्रामस्वच्छतेचे व कलेचे महत्त्व<br>**प्रा. डॉ. शरद बेलोरकर** | १०८-१११ |
| २२ | राष्ट्रसंतांची ग्रामस्वराज्याची संकल्पना<br>**प्रा. डॉ. शरद देवराव उमाटे** | ११२-११६ |
| २३ | निरामय आरोग्य आणि ग्रामगीता<br>**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे** | ११७-१२१ |
| २४ | राष्ट्रसंतांना अपेक्षीत असलेली आदर्श शिक्षण पद्धती<br>**डॉ. प्रा. सौ. एस. पी. लाखे** | १२२-१२८ |
| २५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सामाजिक कार्यसंपदा : एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. वंदना राजेश शिंदे** | १२९-१३३ |
| २६ | संत तुकडोजी महाराज यांचे ग्रामरक्षाचे तत्वज्ञान<br>**डॉ. प्रेमा लेकुरवाळे चोपडे** | १३४-१३९ |
| २७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व भूदान आंदोलन<br>**प्रा. डॉ. लोकेशकुमार एच. नंदेश्वर** | १४०-१४४ |
| २८ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज एक ग्राम सुधारक संत<br>**प्रा. जयवंत नथ्थूजी काकडे** | १४५-१५२ |





Scanned with CamSca

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २३. निरामय आरोग्य आणि ग्रामगीता

डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शि. प्र. मं.तात्यासाहेब महाजन महाविद्यालय, चिखली, चिखली, बुलढाणा.

भारत हा खेड्यांचा देश आहे, त्यामुळे जो पर्यंत खेडी सुधारणार नाहीत तो पर्यंत भारताचा विकास होणार नाही. हे वाक्य आपण आजवर अनेकदा ऐकले आहे. व्यक्तिसमुहातून वाडी, खेडी, गावे आणि शहरे उदयास आलीत त्यातुन पुढे जिल्हे, राज्य विचार आणि संपूर्ण व्यवहार निर्माण झालेत. आपल्या पूर्वजांनी आपल्या येथिल भौगोलिक परिस्थितीचा विचार करुनच आपल्य सामाजिक जीवन पद्धतींची मांडणी केली. मात्र अलिकडील काही वर्षांमध्ये आधुनिकतेच्या नावाखाली आपल्या जून्या निसर्गानुकूल जीवन जगण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झालेत. नवीन आहार-विहारांच्या पद्धतीमुळे एका अस्सल आरोग्यादायी जीवनशैलीत अनेक आरोग्य विघातक परंपरा शिरकाव करू लागल्या. सर्वच प्राणिमात्रांना निसर्गाने प्रदान केलेली प्रतिकारक्षमता फार मोठी देणगी आहे. मात्र निसर्गानुकुल जीवन पद्धतीचा ऱ्हास झाल्यामुहे मानवामधील ती क्षमता हळूहळू कमी व्हायला लागली, आजारी पडण्याचे प्रमाण वाढत चालले, त्यातुन मोठमोठी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल्स उभी राहिलात आण एक प्रचंड मोठा व्यवसाय उदयास आला आज जवळपास सर्वच जण या व्यवसायाचे ग्राहक आहेत.

आज कोरोना या सांसर्गिक आजाराच्या प्रकोपामुळे आपल्या भारतीय आहार आणि उपचार पद्धतीची चर्चा सुरु झाली आहे. प्रतिकार क्षमता ज्यांची चांगली आहे त्यांना कोरोना बाधत नाही, म्हणून प्रतिकारक्षमता वाढविण्यासाठी हजारो वर्षापूर्वी आपल्या पूर्वजांनी सांगितलेल्या अनेक गोष्टी अनेकजन अजमावत आहेत. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने सुद्धा त्याचे महत्त्व सांगायला सुरुवात केली आहे. भारतीय जीवनशैलीचे महत्त्व अनेकांनी सांगितले आहे. वैदर्भीय संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आरोग्यदायी जीवनशैली तुकडोजी महाराजांनी ग्रामविकास कसा साधायचा याचा अति सूक्ष्मतिसूक्ष्म विचार 'ग्रामगीतेतुन' मांडला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामगीतेतील निरामय आरोग्यासाठी सांगितलेले आहार-विहाराचे महत्त्व यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

निरामय जीवन जगण्यासाठी आहार, विहार आचार, विचार हे महत्त्वाचे मुख्य चार आधारस्तंभ असतात. आहार-विहार हे विचारांच्या सोबतीने आचरण घडवित असतात. त्यामुळे विचार निर्मळ, शुद्ध आणि सकारात्मक असतील तर आचरणही तसेच साजेसे असते. आपली नित्य जीवनशैली निसर्ग नियमानुरुप नसेल तर असंतुलन निर्माण होऊन शरीरामध्ये आजारांची निर्मिती होते. शरीराची नैसर्गिक देण असलेली प्रतिकारक्षमता कमी होते व आपण विविध आजारांचे शिकार होतो. त्यासाठी शरीरातील 'मन'रुपी चालक निकोप असणे आवश्यक आहे. मन निकोप असेल तर चांगल्याच विचारांचे चिंतन-मनन सतत होत असते. या चांगल्या चिंतन-मननाचा परिणाम आहार-विहार व आचरणावरही पडतो. मन स्वस्थ तर आरोग्यही 'स्वस्थ' त्यासाठी म्हणजेच निरामय आरोग्यासाठी जीवनपद्धती सुरळीत असायला हवी. लवकर निजे, लवकर उठे, त्यास ज्ञान



Scanned with CamScanner

–आरोगय भेटे' असे उगीच म्हटल्या गेले नाही. शांतचित्त आहार आणि सकाळ संध्याकाळ गरजेनुसार व्यायाम श्रम नसतील तर आरोग्य निरामय राहील कसे?

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी संपूर्ण ग्रामगीतेतुन 'ग्रामवायियांच्या आचार-विचार, आहार-विहार याबद्दल महत्त्वपूर्ण विवेचन संपूर्ण ०८ पंचक आणि ४१ अध्यायातुन केलेले आहे. मात्र निरामय आरोग्यासाठी ग्राम निर्माण पंचकातील 'ग्राम-आरोग्य' या चौदाव्या अध्यायातुन संपूर्ण दैनंदिनीच त्यांनी आखून दिलेली आहे. स्वच्छतेचे महत्वही त्यांनी सांगितले आहे. आरोग्य चांगले राहण्यासाठी व्यायामाचे महत्त्व त्यांनी स्व आचरणातुन सांगितले आहे. देश बलवान बनवायचा असेल तर प्रत्येकजन बलवान असली पाहिजे,प्रत्येक युवक, युवती बलवान आणि गुणवान व्हयला पाहिजे असे त्यांना वाटत होते. 'स्वतंत्र भारतातील सर्वसामान्य लोकांत चैतन्य ओतल्याशिवाय भारत उन्नतिपथाकडे वळणार नाही. त्यासाठी शारीरिक व्यायामाचे वर्ग व शिबीरांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे. याच वर्गातुन सबल व सतेज नागरिक तयार होतील असा विश्वास महाराजांना वाटत होता.[१]

आरोग्यदायी जीवन जगायचे असेल तर सकाळी ब्राम्हमुहूर्तावर उठलेच पाहिजे व सकाळी उष:पान तसेच शीतलजलस्नान झाले पाहिजे तसेच कोणी धावती,

कोणी चालीती । कोणी आसने, सुर्यनमस्कार घालती,
कोणी गाती, चिंतन करिती । हे दृश्य दिसते प्रभाती ॥ अ. १४ ओ. ४८

गावागावात सकाळी असे दृश्य दिसले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यासाठीच त्यांनी व्यायाम शाळा स्थापन करुन व्यायाम शिबीरे आयोजीत केलीत. व्यायामहीन मनुष्य हा स्वत:चा व राष्ट्राचाही शत्रू असतो; असे ते म्हणत असत. आज आपणास समाजात प्रचलीत पद्धतीत दिसते की उत्तररात्रीपर्यंत टि.व्ही. जेवनावेळी, पार्टी चालतात. त्यामुळे सकाळी उठण्याचा प्रश्नच नसतो.

एकदा रात्रभरि जागला । मग सकाळी उठणेच कशाला?
आळसात सर्व दिवस गेला । नियम मोडोनी ॥ अ. १४ ओ. २७

अशी दिनचर्या असलेल्या लोकांना आरोग्य ते कसले लाभणार? त्यामुळे त्यांचा संपूर्ण दिवस जांभया देण्यात आणि आळसात जातो. कुठल्याच कामाचा त्यांना उत्साह नसतो. आज उशिरा उठणारे सुर्यवंशी मोठ्या प्रमाणात बघावयास मिळतात. ते स्वत:ला भाग्यवानही समजतात. पण अशांना तुकडोजी महाराज म्हणतात,

'भाग्यवंताची उलटी व्याख्या । करणे शोभतेका शहरण्यासारख्या?
अरे! सकाळी उठणारासचि सख्या । भाग्यवंत म्हणावे ॥ अ. १४ ओ. ४१.

सकाळी उशिरा उठल्यामुळे आरोग्य चांगले राहत नाही. आजारपण मागे लागते. डॉक्टरांचे भोग पाठीमागे लागतात. तसेच त्यामुळे उद्योगही बिघडत जाऊन घरात एक प्रकारचे दुर्भाग्य शिरते; म्हणून सकाळची शुद्ध हवा, आरोग्यदायी हव सर्वांनी घेतली पाहिजे. यासाठीच त्यांनी ब्राह्ममुहूर्तावर उठण्याचे महत्त्व प्रकर्षाने सांगितले आहे.



Scanned with CamSca

प्रातः काळाची आरोग्यदीय हवा । सदा सर्वदा मानवते जीवा ।
प्रसन्नता देई ऋतु ते धवा । सर्व प्राणीमात्रांसि ॥ अ. १४ ओ. ४१.

आजकालच्या तरुणायीचा व्यायाम-योग याकडे फारसा कल दिसतस नाही. पायी चालण्याचे प्रमाण खूप कमी झाले आहे. थोड्या अंतरावर जाण्यासाठी सुद्धा दुचाकीच वापर केल्या जातो. त्यामुळे शारीरिक श्रम खूप कमी झाले आहेत. त्यामुळे वजन वाढण्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेक प्रकारचे आजार डायबेटीज, ब्लडप्रेशर या व्याधी मोठ्या प्रमाणात बळावल्या आहेत. मेद वाढल्यामुळे इतरही अनेक आरोग्याचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळेच तुकडोजी महाराजांनी व्यायामाचेस महत्त्व तर सांगितलेच सोबतच आहर कसा सात्विक असला पाहिजे यावरही भाष्य केले आहे. व्यायाम आणि आहार ह्या मानवी जीवनातील दिव्य औषधी आहेत.'नित्यनियमित व्यायाम करणे हे एक दिव्य औषध आहे; कारण वारा आणि पाणी वाहत राहल्याशिवाय् शरीर निरोगी राहू शकत नाही. मग ते तुम्ही कोणत्याही प्रकारे याचे हलन-चलन करा पण शारिरिक संचालन व्हायलाच हवे. ळाहान-सहान रोगापासून तो हृदय रोगासारख्या इतरही महान रोगांवर जर एकमेव अमृत असेल तर व्यायाम. व्यायाम आसनादी प्रयोग करणाऱ्यांना प्रथमतः रोग घेरू शकत नाही आणि झाला तर तो व्यायामाने विनामुल्य दूर होतो. शेवट डॉक्टरही तेच सांगतात व करतात' [२] म्हणूनच तुकडोजी महाराजांनी विविध भारतीय खेळ, धावणे, पोहणे, खेट, व्यायाम इत्यादींचे महत्त्व ग्रामगीतेत सांगितले आहे. महाराजांनी सांगितलेल्या दैनंदिनीचे जीवनात अनुसरण केल्यास रोग आणि मृत्यू आपणापूढे लोटांगण घेतील. त्यामुळेच ब्राह्ममुहूर्तावर उठण्योच महत्त्व ग्रामगीतेत अनेकदा आलेले आहे.

आहार ही सुद्धा एक दिव्य औषधी आहे असे वर नमुद केले आहे. ते अगदी खरे आहे. महाराजांनी सात्विक आहाराचे महत्त्व सविस्तरपणे विशद केले आहे. अलिकडील काळात फास्टफुडच्या आहारी जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले; त्यामुळे आरोग्याचे नवनवे प्रश्न उभे राहिले आहेत. परंतु सात्विक आहार कोणता? आणि तो कसा सेवन केला पाहिजे याबद्दल ते म्हणतात स्वच्छ वातावरणात जठराग्नी वाढविण्यासाठी हात पाय स्वच्छ धुवून जेवनास बसावे. शांतिमंत्र म्हणावा,श्लोक म्हणावेत आणि प्रसन्नचित्त अन्न सेवावे.

वजस, तामस, सात्विक । भोजनाचे प्रकार अनेक ।
त्यात आपली शक्ति पाहूनि सम्यक । पचेल तैसे करावे ॥ अ. १४ ओ. ८८

आपल्या प्रकृतीला रुचेल, पचेल असेच अन्न आपण सेवावे. आपल्या पूर्वजांनी भारतीय भौगोलिक परिस्थितीनुरुप आणि ऋतूमानानुसार आहार सांगितलेला आहे. मात्र अलिकडील फास्टफुडच्या काळात आमचे भारतीय आहारशास्त्र लोक विसरत चालले आहे. आपण कसला आहार सेवन करतो. त्याचा सर्वात जास्त परिणाम आपल्या शरीरावर हात असतो. त्यामुळेच तुकडोजी महाराजांनी साध्या आणि सात्विक आहाराचे महत्त्व सांगितले आहे. सात्विक अन्न हे सहज कुठेही मिळते. श्रमाने शेतात पिकवलेली भात, भाजी, पोळी हेच सात्विक अन्न आहे असे महाराज म्हणतात –

साधे, सहज, ताजे, पावन । तेचि असे सात्विक अन्न ।
नाना विकृतिंचे मिन्टान्न । ते सात्विक नव्हे ॥ अ. १४ ओ. १०७



Scanned with CamScanner

शरीराचे पोषण करणारा कळणा कोंडा असलेला सात्विक आहारच महत्त्वाचा आहे. मिष्टान्न, तिखट, तळलेले, मसालेदार पदार्थांचे नियमित सेवन करु नये.

काही लाडू, पेढे खूपचि खाती । रबडी, हलवा तंडोनि घेती ।
पैसे ठरवोनि माप लाविती । खावयाचे ।। ११५
मग त्याने पचन होईना । सारा शरीराचा होय थिंगाणा
नाना रोग जडती, यातना । द्यावयासि ।। अ. ११६ ओ. १४

मिष्टननोच नियमित सेवन झाल्यास नाना प्रकारच्या व्याधी मागे लागातत. आज आपल्या बदललेल्या जीवनशैलीत आहारामध्ये अनेक नवनवीन व्यंजने आली आहेत. जन्म दिवसव, लग्न,वाढदिवसारखे छोटे छोटे आनंदाचे क्षण हॉटेलमध्ये जाऊन साजरे करण्याची परंपरा आज रुढ झाली आहे. याशिवाय भेळ, पाणीपुरी, सारख्या पदार्थांच्या गाड्या प्रचंड वाढलेल्या आहेत. सायंकाळच्या वेळेला अशा गाड्यावर प्रचंड गर्दी बघावयास मिळते परंतु अशा ठिकाणी मिळणारा आहार हा आरोग्यदायी मुळीच नसतो. म्हणूनच महाराज म्हणतात प्रकृतीच्या विरुद्ध असलेला आहार हा एक प्रकारचे विषय असतो.

नियमित सात्विक अन्नाचि खावे । साधे, ताजे, भाजीपाले बरवे ।
दूध, दही आपल्या परी सेवावे । भोजन करावे औषधचि ।। ओ.१२६ अं. १४

प्रकृतिविरुद्ध असलेले भोजन हे विष आह आणि प्रकृतिनुरुप भोजन हेच औषधही आहे; आणि अमृतही आहे.

निरामय आयुष्यासाठी ज्याप्रमाणे आहार, व्यायाम यांचे महत्त्व आहे त्याप्रमाणे शुद्ध आचरण आणि शुद्ध विचार सुद्धा महत्त्वाचे आहेत. आज समाजामध्ये पूर्वीपेक्षा स्वार्थ मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. प्रत्येक जन पैशांच्या पाठीमागे लागलेला आहे. त्यासाठी प्रसंगी दुसऱ्याची लुबाडणुक करुन; राज्यामध्ये धर्मा-धर्मात, गावांमध्ये, घरा-घरात एवढेच नव्हे तर सख्या भावांमध्येही वितुष्ट निर्माण झालेले बघावयास मिळते आहे. याल एकच कारण आहे तो म्हणजे पैसा. पैशांसाठी माणुस आज कुठल्याही थराला जायला तयार आहे. अल्पावधीमध्ये कमी श्रमात मी श्रीमंत झालो पाहिजे ही भावना सर्वांमध्ये दिसते आहे. त्यामुळेच हळूहळू विचार संकुचित होत गेले आणि आचरणही विचारानुसार पर बिघडून गेले आहे. मानवाची मन:शांती आजच्या युगात अशा प्रकारच्या विचार आणि आचरणामुळे पूर्णत: नष्ट झाली आहे. समाजाला दुषित करणारे विचार आणि आचार बदलण्यासाठी अनेक संत-महंतांनी प्रयत्न केलेले आहेत. परंतु समाजाच्या अशा प्रकारच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रसंतांची प्रकर्षाने आठवण येते. समाजातल्या धर्मा-धर्मातील, जातिपातीतील, घरा-घरातील वैमनश्य संपले पाहिजे, तसेच सर्वांचे विचार आणि आचार हे शुद्ध असले पाहिजे तरच देश प्रगती करु शकेल. यासाठी ग्रामगीतेच्या प्रत्येक अध्यायात त्यांनी प्रबोधन केले आहे.

जीवन-कला या ३६ व्या अध्यायात राष्ट्रसंतांनी प्रत्येकाच्या जीवनाची जी कल्पना केलेली आहे ती नितांत सुंदर आहे. त्याप्रमाणे प्रत्येकाचे वर्तन असेल तर समाजामध्ये दुही निर्माण होऊच शकत नाही. ही जीवनकला अंगी आणल्यास शुद्ध विचार आणि आचरणच सर्वांमध्ये दिसेल, कुठेही स्वार्थ नसेल.



Scanned with CamSca

सामुदायिक वृत्तीविण । जगी टिवले प्राणी कोण? ।
जगावे, जगवावे, जीव, जन । हीच खरी जीवन-कला ॥अ३६, ओ – ५३

सामुदायिक जीवन हे मानवी जीवनाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे एकमेकांना समजून घेत जीवन जगता आले पाहिजे. समाजात श्रीमंत गरीब हा भेद नसावा, एकमेकांना सुख-दुःखात मदत करावी, जिथे उणेपण जाणवेल ते भरून काढण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा. या राष्ट्रसंतांच्या विचाराचे समाज अनुसरण करेल तर ते म्हणतात.

'प्रयत्ने मानव होई देव । प्रयत्ने स्वर्गतुल्य होई गाव ।
संतांच्याहि अभेदभक्तीचे वैभव । ग्रामसेवा- प्रयत्नी ॥ अ. ३७ ओ. १०२

समाजातील सर्वांचे विचार आचर शुद्ध असावे त्यासाठीच महाराजांनी रामधुन, सामुदायिक प्रार्थना असे उपक्रम सुरु केलेत. ही प्रार्थना माणसाला स्वर्ग प्राप्त व्हावा यासाठी नाही तर प्रार्थनेतुन माणसाला 'देशभक्ती, शेजाऱ्याचे सुखदुःख, माणुसकी या गोष्टी आधी कळल्या पाहिजेत. आजची आपली सामुदायिक प्रार्थना माणसाने माणूस बनावे, त्याने इमाने-इतबारे आपला रोजगार, करावा, आळसी कोणी राहू नये ह्या भावना मनात शिरण्यासाठी आहे'. असे प्रार्थनेचे मानवी जीवनातील महत्त्व त्यांनी समाजाला पटवून दिले आणि प्रार्थनेमुळे विचार शुद्ध बनतात, आचरणही शुद्ध राहते व साहजिकच आत्मसंतुष्टी प्राप्त होवून आरोग्यही चांगले राहते.

निरोगी आयुष्यासाठी स्वच्छता महत्त्वाची असते. अलिकडील काळात मा. पंतप्रधान यांच्या स्वच्छ भारत मोहिमेमुळे आणि कोरोनाचे आगमन झाल्यानंतर स्वच्छतेला अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे. गेल्या २-३ महिन्यात सतत हात स्वच्छ ठेवा अशा घोषणा कानावर पडतात तेव्हा राष्ट्रसंतांनी सांगितलेली ग्रामस्वच्छता आठवल्याशिवाय राहत नाही. राष्ट्रसंतांच्या विचारांचे हे चिरंनत्व आहे. आजही अशा विचारांची गरज आहे.

**निष्कर्ष**

कोरोनाच्या या संक्रमणाच्या काळात प्रत्येक व्यक्ती आपले आरोग्य चांगले ठेऊ इच्छितो. त्यामुळे राष्ट्रसंतांनी सांगितलेली दैनंदिनी कारणे हितावरच ठरणार आहे. जगातील अत्यंत बलाढ्य आणि प्रगत राष्ट्रे सुद्धा कोरोनापासून जनतेला वाचवू शकली नाहीत. त्यामुळेच निरामय आयुष्य जगावयाचे असेल तर महाराजांनी सांगितलेली दिनचर्या, ब्रह्ममुहूर्तावर जागे होणे, सकाळी व्यायाम करणे, सात्विक आहारामध्ये तद्वतच विचार आणि आचरण शुद्ध असणे आवश्यक आहे. राष्ट्रसंतांनी सांगितलेला हाच निरामय आयुष्याचा मुलमंत्र आहे.

**संदर्भग्रंथ**

१. कडवे रघुनाथ, मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी, अमोल प्रकाशन नागपुर. आवृत्ती, २०१२, पृष्ठ १७८.

२. बेलूरकर र. मो. 'ग्रामगीता अविष्कार, ' सद्गुरु ऑफसेट, प्रिन्टर्स, तळेगाव, पृष्ठ २१

३. कडवे रघुनाथ, तत्रैव, पृष्ठ ४०६-४०७



Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**February-2020**

**SPECIAL ISSUE-CCXIV(214)**








**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

**Aadhar Publications**

Scanned with CamSca

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**February-2020**

**SPECIAL ISSUE-CCXIV (214)**








**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head,Deptt.of Economics,
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamSca

ISSN : 2278-9308
February 2020


| | | |
|---|---|---|
| 42 | Current Challenges Facing In Indian Economy<br>Dr. Sushama Deshmukh | 195 |
| 43 | Indira Gandhi – A Woman Of Scientific Temper<br>Dr Mubaraque Quraishi | 198 |
| 44 | Globalization And Its Impact On Indian Economy<br>Dr. Prakash U. Jawanjal | 201 |
| 45 | Impact of Globalization on Rural Economy and Gandhian Thoughts<br>Dr Archana V. Bhangdia | 206 |
| 46 | The Nature of language learning and language teaching in India classroom<br>Dr.Sopan S.Bonde | 210 |
| 47 | Theme of violence In Amitav Ghosh's "The Glass Palace<br>Dr.Sachin S. Matode | 214 |
| 48 | The Envronmental Advocacy Through P B Shelley's Poectic Composition<br>Dr. Vinod Pralhad Chaudhari | 218 |
| 49 | विषवृक्षाच्या मुळया ' मधील सहकाराच्या यशापयशाचे चित्रण<br>डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 222 |
| 50 | वारकरी फडाचा उदय<br>प्रा. डॉ. न. ह. खोडे | 226 |
| 51 | ग्रामीण विकासामध्ये राष्ट्रीय धोरणाचे योगदान<br>प्रा.डॉ.सौ. सुनिता एस.राठोड | 231 |
| 52 | ग्रामीण महीला सक्षमीकरणात बचत गटाची भुमीका— एक अभ्यास<br>प्रा.कविता आर किर्दक | 237 |
| 53 | कुसुमाग्रजांची सामाजिक कविता एक आकलन<br>प्रा.डॉ.प्रशांत वाल्मिकराव धनवीज | 239 |
| 54 | संत तुकारामांच्या अभंगातील आत्मभान व समाजभान<br>प्रा.डॉ.विजय रूपराव राऊत | 245 |
| 55 | भारतातील शहरीकरणाचा कल समस्या आणि सामाजिक प्रश्न<br>प्रा. डॉ. साहेबराव चौव्हान | 249 |




Scanned with CamSca

# विषवृक्षाच्या मुळया ' मधील सहकाराच्या यशापयशाचे चित्रण

डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली

प्रास्तविक :–

१ मे १९६० ला संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्रात सर्वच क्षेत्रात जे मन्वंतर घडू लागले होते त्यामुळे सर्वच क्षेत्रात झपाटयाने बदल जाणवत होते. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादीसोबतच कृषिक्षेत्रातही आधुनिकीकरणासोबत सहकाराच्या माध्यमातून कृषिक्षेत्राचा विकास करण्याचे स्वप्न महाराष्ट्रातील श्रेष्ठींनी उराशी बाळगले होते. ' एकमेका साहय करू अवघे धरू सुपंथ ' या तत्वावर ' विना सहकार नाही उध्दार ' असे नारे लावत महाराष्ट्रात सहकार चळवळ जोमात आली. सहकार चळवळ ग्रामीण परिवर्तनाचा एक भाग बनली. सहकार चळवळीच्या रूपाने ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनात थोडा दिलासा निर्माण झाला. कृषिअर्थव्यवस्थेच्या विकासाला ही चळवळ वरदानाच ठरणार असे वाटू लागले. मात्र सहकारात मोठया प्रमाणात अर्थकारण सुरू झाल्यामुळे राजकीय मंडळीने आणि नोकरदार वर्गाने हया चळवळीचे बारा वाजविले. शेतकऱ्यांना सावकाराच्या जाचातून बाहेर काढण्यासाठी उभी राहिलेली ही सहकार चळवळ हळूहळू शेतकऱ्यांचा घात करणारी ठरली. या चळवळीने शेतकऱ्यांना पारावलंबित्व शिकविले. सहकार चळवळीतील राजकारणी, नोकरदार यांनी सहकाराचा हा कल्पवृक्ष कसा विषवृक्ष करून टाकला याचे वास्तव चित्रण वासुदेव मुलाटे यांनी त्याच्या ' विषवृक्षाच्या मुळया ' या सहकार क्षेत्रावरील कादंबरीत केले आहे.

वासुदेव मुलाटे यांची साहित्यक्षेत्रातील ओळख कथाकार, कादंबरीकार म्हणूनच आहे. मात्र·नाटय ललितनिबंध, वैचारिक, चिंतनात्मक, समीक्षणात्मक असे लेखनही त्यांनी केले आहे. सहकाराच्या क्षेत्रात १४–१५ वर्षे त्यांनी स्वत:सेवा केलेली असल्यामुळे प्रस्तुत कादंबरीत त्यांनी सहकार क्षेत्रातील चांगल्या आणि वाईट अशा दोनही प्रवृत्तींचे वास्तव चित्रण केले आहे. ' विषवृक्षाच्या मुळया ' ही कादंबरी १९८९ मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीतील सहकाराच्या वास्तव चित्रणाबद्दल नागनाथ कोत्तापले म्हणतात.......' परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की एवढी परिणाम करणारी चळवळ वाड.मयीन जगतापासून दुरच राहिली, हे सहकाराचे जग या कादंबरीतून प्रथमत:च त्याच्या सामर्थ्य आणि मर्यादासह साकार होते आहे. ही महराठीतील अशा प्रकारची एकमेव कादंबरी आहे'.[१] स्वातंत्र्यपुर्वकाळातच सुरू झालेली ही चळवळ महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंराव चव्हाण आणि पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या राजाश्रयामुळे खऱ्या अर्थाने १९६० नंतरच उभी राहिली. प्रारंभी कृषि पतपुरवठयापुरती मर्यादित ही चळवळ मोठया प्रमाणात विस्तारत गेली. त्याचे सुपरिणाम कृषिअर्थव्यवस्थेत दिसायला लागले होते. मात्र प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. त्याप्रमाणे सहकाराच्या दुसऱ्या बाजूने उचल खाऊन या चळवळीत प्रचंड अनागोंदी, भ्रष्टाचार सुरू झाला. शेतकरी मात्र कर्जाच्या खाईत ढकलल्या गेला. हेच वास्तव ' विषवृक्षाच्या मुळया ' कादंबरीच्या कथानकात जाणवते.

२) सहकारामुळे कृषिअर्थव्यवस्थेत झालेल्या चांगल्या बदलांचे चित्रण :–

१९६० नंतर सहकार चळवळीचा महाराष्ट्रात चांगला प्रसार झाला. शेतकऱ्याला आपल्या गरजा भागविण्यासाठी पैशाची अडचण भासल्यास सावकाराजवळ जाण्याशिवाय पर्याय नसे. म्हणूनच प्रारंभी सहाकरी बॅकांच्या माध्यमातून कर्जाऊ रकमा ग्रामीण गरजूंना पुरविण्यात आल्या, जोणेकरून सावकाराच्या पाशातून त्याची मुक्ती होईल. पुढे सहकारी तत्वावर अनेक संस्था उभ्या राहिल्या आणि सहकारी संस्थांचे जाळे महाराष्ट्रभर विणल्या गेले. पतपुरवठा, कुक्कुटपालन, दुधसंघ, सहकारी साखर कारखाने यासोबत इतरही संस्था उभ्या राहिल्या. ' सहाकारतून समृध्दीकडे ' असे काहीसे वाटावयास लागले. प्रस्तुत कादंबरीत सहकाराचा जो मूळ उद्देश होता त्याचे विस्ताराने वर्णन आलेले आहे. विश्वनाथचा मित्र लोखंडे म्हणतो “ सहकारी पतसंस्था, बॅका



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
February 2020

यांच्याकडून कर्ज घेऊन अनेकांनी शेती सुधारली. तिकडे अहमदनगर, जिल्हयांचनं बघ ना, काय होतं तिथं? पाऊस कमी, दुष्काळी पट्टा. पण प्रवरेचं पाणी आलं. पदमश्री विखे पाटलांच्यामुळे पहिला सहकारी साखर कारखाना आला. साखर कारखान्यामुळे ऊसाची लागवड वाढली. सहकारी संस्थांकडून मदत झाली. कष्टाचं आणि पैशाच चीज झालं. एवढा दुष्काळी जिल्हा पण आज सगळा कायापालट झालाय. शेतकऱ्याच्या घराघरातून समृध्दी आली. आज तिथला शेतकरी मोटार सायकलवर शेतात जातो. शेतीत इलेक्ट्रीक मोटार पंप, ट्रॅक्टर अत्याधुनिक खतं, उत्तम बी–बियाणे वापरतो. केवळ बागायत शेती वाढवलीय त्यांनी सांगली, सातारा, कोल्हापूर इकडे तरी काय दिसतं? सहकारी संस्थाचं किती जाळ पसरवलय त्यांनी. ( पृष्ठ क्र ८६.–८४)" प्रारंभी या सहकार चळवळीचा फायदा झाला, त्यातून काही प्रमाणात समृध्दीही निर्माण झाली. हे चित्र विशेषत: केवळ पश्चिम माहाराष्ट्रातले होते. इतरत्रही काही शेतकऱ्यांनी या चळवळीचा आपल्या विकासासाठी चांगला फायदा करून घेतला. भू–विकास बॅकांकडुन दिर्घ मुदती कर्जे घेऊन विहिरी खोदून कायमची सिंचनाची व्यवस्था करून घेतली व आपला विकास साधला. विश्वनाथच्या शेजारच्या कळमनुरीचा सावत त्याला म्हणतो, " अहो, आमचं तरी कुठं काय होत? हे आता झालंय भूविकास बॅकेंचं कर्ज काढलं, विहीर खोदली, देवयोगाने मूबलक पाणी लागलं,विहीर बांधुनही काढली मग इलेक्ट्रीक मोटारसाठी अर्ज केला. मोटार बसवली. आता उत्पन्न वाढलं. कर्ज अजून फिटलं नाही बॅकेचं; पण त्याचं काही वाटत नाही बघा आता. कसं स्वप्नात घडल्यासारखं वाटतं तुमच्या बॅकेनं फार साथ दिली." यावरून सहाकरी बॅकांचा फायदा घेतला तर शेतीचा विकास निश्चित होऊ शकतो अशी धारणा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण होऊ लागली होती. ' ग्रामीण भागात या काळात वेळोवेळी परिवर्तने होत होती आणि या परिवर्तनाचा एक भाग होती ' सहकार चळवळ ' यामुळे ग्रामीण भागतील लाकांचे जीवन अनेक अंगांनी बदलत होते. सहकार चळवळीच्या रूपाने ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनात थोडा दिलासा निर्माण होत होता.[२] या अभिप्रायवरूनही सहकाराच्या रूपाने शेतकऱ्यांना एक वरदान मिळाले होते असे दिसते. सहकार क्षेत्राचा उद्देश खूप चांगला आणि सर्वाच्या हिताचा होता. त्यामुळे कृषिअर्थव्यवस्थेस चांगलीच उभारी मिळू लागली होती. प्रस्तुत कादंबरीत अहमदनगर जिल्हयाचे तिथल्या शेतकऱ्यांच्या विकासाचे चित्रण आलेले आहे.' विना सहकार नाही उध्दार ' असे म्हणत जेवढया वेगात सहकाराची ही चळवळ प्रसार पावली. तेवढयाच वेगात या अत्यंत चांगल्या योजनेत काही वाईट प्रवृत्तींनी प्रवेश केला. महाराष्टातील सहकार चळवळी राजकीय मंडळींच्या हातात गेल्या. राजकारणी आणि कर्मचारी यांच्या दुष्ट प्रवृत्तीमुळे ग्रामीण माणसांच्या जीवनात दु:ख, दारिद्रय फसवणूक, शोषण सुरू झाले. शेतकऱ्यांच्या जीवनात असंख्य प्रश्न पूर्वीपासून होतेच. त्यात सहकारातील या शोषणाच्या प्रवृत्तीमुळे आणखी भर पडली. वासुदेव मुलाटे यांनी हे क्षेत्र फार जवळून बघितले असल्यामुळे त्यांनी सहकाराचा जो मूळ हेतू होता त्याचे चित्रण केले आहे. मात्र पुढे चांगल्यापेक्षा सामान्यांच्या जीवनात या चळवळीमूळे वाईटच जास्त होऊ लागले, इथला सामान्य शेतकरी भरडल्या जाऊ लागला, कर्जबाजारी होऊ लागला त्यामुळे कृषिअर्थव्यवस्थेच्या प्रगतीत फार मोठी बाधा उत्पन्न झाली आणि एक लांबलचक लुटीचे सत्र या चळवळीमुळे सुरू झाले या संपूर्ण परिस्थितीचे वास्तव दर्शनही प्रस्तुत कादंबरीतून त्यांनी घडविले आहे.

**३) सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे चित्रण :–**

' एकमेका साहय करू अवघे धरू सुपंथ ' या ब्रीद वाक्यावर कृषिअर्थव्यस्थेमधील प्रत्येक घटकाच्या कल्याणासाठी उभी राहिलेली ही सहकार चळवळ भ्रष्टाचारामुळे कुपंथाला लागली. ज्या काळात मुलाटे या क्षेत्रात होते, त्या काळामधले महाराष्ट्रातील राजकीय पातळीवर होणारे शोषण समाजाला दु:खदयी गुलामीकडे घेऊन जाणारे हाते. परकीय जाचापेक्षा स्वकीयांचा जाच ग्रामीण शेतकरी आणि सामान्य माणूस सहन करीत होता. राजकारण्यांनी चालविलेली मनमानी, सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रभाव, त्यांच्या संगणमताने सहकार क्षेत्रातील प्रशासकीय यंत्रणेतील आणि सहकार क्षेत्राबाहेरील सरकारी अधिकारी यांच्या रूपाने शोषकांचा एक मोठा नवा वर्ग महाराष्ट्रामध्ये निर्माण झाला होता. अगोदरच जनता जीवघेण्या दुष्काळामध्ये होरपळत होती. त्यात या शोषणामुळे सर्वसामान्य त्रस्त झालेले होते. मुलाटे सरांनी हे विदारक वास्तव जवळून बघितले असल्यामुळे त्यांनी प्रस्तुत कादंबरीच्या रूपाने ते अभिव्यक्त केले आहे.



Scanned with CamSca

सहकाराला ' स्वाहाकाराचे ' रूप कसे प्राप्त झाले आणि संवदेनशील माणसाचा या भ्रष्टाचारामुळे कसा कोंडमारा होतो हे विश्वनाथ तराटेंच्या जीवनानुभवातून लेखकांनी सांगितले आहे. कादंबरीच्या अगदी प्रारंभपासूनच सहकारातील भ्रष्टाचार नजरेसमोर येतो. विश्वनाथ परभणीस सहकारी बँकेंत नोकरीसाठी मुलाखतीस जातो. तेव्हा त्याला भोसले म्हणतो. " तुम्ही फारशी होप्स ठेवू नका..... आता हे इंटरव्हयुचं बँकेने काढलंय ना? तो निव्वळ फार्स...... इथं प्रत्येक डायरेक्टरचा एक उमेदवार म्हटलं तरी बाकी जागा उरतातच किती?"(पृष्ठ क १८) आजवर बँकेंचा नोकरदार वर्ग पात्रतेऐवजी संचालक मंडळांचे जवळचे म्हणूनच भरल्या गेला होता. संचालकांच्या अशा धोरणामुळे बँक डबघाईस येते व प्रशासक नेमल्यामुळे बँकेच्या इतिहासात पहिल्यांदाच मुलाखती घेतल्या जातात. प्रशासक आल्यामुळे पात्रतेच्या आधारावर विश्वनाथची निवड होते, आणि सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे विष अनुभवण्याची संधी त्याला मिळते. कळमनुरीच्या बँकेंत बँकेचे कर्मचारी व सावकार संगणमताने सर्वसामान्य शेतकऱ्यांची कर्जाची प्रकारणे नवंजुनं करून कशी मान्य करतात, त्यातून लिंगाप्पा सारखा सावकारही आले स्वार्थी हित कसा साध्य करतो हे कळते. यातून सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या अंगावर कर्जाचा भार वाढतो, व्याज वाढते आणि ते थकबाकीदार होतात. जालन्याच्या भू—विकास बँकेतही विश्वनाथला भ्रष्टाचाराची अशीच साखळी दिसते. बँकेचे चेअरमन शेतीला लागणाऱ्या मोटर पंप सारख्या वस्तूंचे दुकान थाटून बसलेले आणि ते त्याच शेतकऱ्याचं कर्ज मंजूर करतात जो त्यांच्या दुकानातून माल घेईन. बँकेचे कर्मचारीही विहिरीसाठी शेतकऱ्यांकडून पाटर्या घेतात. एखादा विहिर बांधतोही परंतु अनेक खातेदार केवळ कर्ज उचलून दूसऱ्याच कारणासाठी खर्च करतात, त्यामुळे ते कर्जबाजारी होतात. याचा दोष विश्वनाथ शेतकऱ्यांनाही देतो. मग सोसायटीचे कर्ज फेडण्यसाठी व जप्ती टाळण्यासाठी सावकाराकडून अमर्याद व्याज दराने कर्ज घेतो आणि कर्जाच्या खाईत जात राहतो. या वाढत्या प्रवृत्तीमुळे संपूर्ण कृषिक्षेत्राचा आणि सामान्य माणसाचा विकासच खुंटला आहे असे विश्वनाथला वाटते.

सत्तास्पर्धेमुळे आणि कर्मचाऱ्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे सहकार खात्यात या लबाडयांचे प्रमाण प्रचंड वाढले. प्रामाणिकपणा पूर्णत:लयास गेला. बिचाऱ्या अज्ञानी, गोरगरीब शेतकऱ्यांना वेठीस धरल्या जाऊ लागले. विश्वनाथला बस मध्ये एक प्रवासी सांगतो, माझ्या अज्ञानी वडिलांनी पाचशे रू पीककर्ज काढले. दुसऱ्या वर्षी केवळ व्याज भरून कर्ज नवं—जुनं करतांना पाचशे रूपये कर्ज न दाखवता ५०००/— रू. कर्ज वडिलांच्या नावावर टाकण्यात आले. कर्जाची परतफेड न केल्यास जप्तीची धमकी देण्यात आली. वडिलांनी परत सावकाराकडून कर्ज काढले व जप्तीची बेईज्जती टाळली. तो प्रवासी पुढे त्या सोसायटीबद्दल आणखी सांगतो, " वसुलीच्या पावत्या फाडल्यात पण रक्कम जमा नाही. सोसायटीत नांगर आहेत, फवारणी पंप आहेत, औषधखतं विक्रीला आहेत, त्यांच्या भाडयाच्या, विक्रीच्या रकमा जमा नाहीत...... वीस पंचेवीस हजाराचा घोळ. आलेला पैसा दारू, कोंबडे, बाया, पत्ते एक्का दोन हजार वाटांनी गेला,"(पृष्ठ क ९६) " पुढे पोलीस केस झाल्यामुळे सोसायटीच्या चेअरमनने आत्महत्या केल्याची माहितीही तो विश्वनाथला सांगतो . विश्वनाथ जेव्हा प्रशासक म्हणून खेडर्याला जातो तेव्हा तेथील चेअरमनने खताचे मध्यम मुदती कर्जाचे, म्हशींच्या खरेदी—विक्रीचे अनेक संशयास्पद व्यवहार करून पैशांचा अपहार केलेला असतो. याच खेडयामध्ये म्हस्के हॉटेलवाला स्वस्त धान्य सोसायटीतून पोतेच्या पोते साखर हॉटेलमध्ये नेतो. विश्वनाथलाही लाच देऊन साखरेची मागणी करू पाहतो. म्हस्के म्हणतो, " त्ये ची नगा काळजी करू, ते तुमी चंदू मारवाडयावर सोपवा. कसं की आमच्या गावाला गरीबी लयी बगा. हितं जेवारी आणायलाच पैसे न्हायीत म्हटल्यावर साखर कोण घितो? भाऊसाहेब काय आन तुम्ही काय ? आमाला दोघं बी सारखेच. जे त्यायला ते तुम्हाला " ( पृष्ठ क १०८) सर्वसामान्यांच्या तोंडचा घास ओढण्याचा हा प्रकार सर्रास सर्वत्र राजरोस सुरू होता. अधिकारी अशा सोसायटयांच्या भेटीस गेल्यावर प्रत्येक सोसायटीतून थोडे करीत करीत असा शिधाआटा जमा करतात. हे सर्व बघुन विश्वनाथला वैताग येतो.

शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळवा, व्यापाऱ्यांकडून त्यांची लुट होऊ नये म्हणून शासनाने फेडरेशनच्या माध्यामातून कापसाची खरेदी सुरू केली होती. परंतु राजकारणी आणि फेडरेशनच्या नोकरदारांनी याही योजनेत प्रचंड भ्रष्टाचार केलेत. त्याचेही चित्रण मुलाटे सरांनी केले आहे. ग्रेडर पैसे दिले नाहीत म्हणून गोरगरीबांचा कापूस खालच्या ग्रेड मध्ये टाकतात.



Scanned with CamSca

ISSN : 2278-9308
February 2020

श्रीमंताचा किंवा व्यापाऱ्यांचा कापूस लाच दिली म्हणून चांगल्या ग्रेडमध्ये टाकतात. कापसाचे वजन वाढवून देतात. शेवटी हा भ्रष्ट व्यवहार लपविण्यासाठी कापसाला आग लावून देतात. कापूस एकाधिकार योजनेत अनेक शेतकऱ्यांनी ग्रेडरच्या भ्रष्टाचाराचा आणि अशा आगींचा अनुभव प्रत्यक्ष घेतलेला आहे. विश्वनाथला सामान्य शेतकऱ्यांना साखर कारखान्याचे शेअर्स कसे जबरदस्ती जास्तीचे कर्ज मंजूर करून दिल्या जातात याचे दुःख वाटते. सामान्यांच्या विकासासाठी सहकारी साखर कारखाना उभा केला जातोय, हे केवळ नावालाच; परंतु त्यात राजकारण्यांचा स्वार्थी हेतूच असतो असे त्यास वाटते. अनेकानेक साखर कारखाने पुढे आजारी पडून बंद पडले ते यामुळेच. सहकारातील हा संपूर्ण भ्रष्टाचार बघून विश्वनाथला गुदमरल्यासारखे होते. तो विचार करतो, " ..... ...हा सहकार म्हणे, परंपरागत सावकाराच्या तावडीतून शेतकऱ्याला सोडविण्यासाठी आलेली ही सहकारी संस्थाची सावकारशाही परस्परांना सहकार्याचा हात देणारी सहकाराची कल्पना हीच का? माणसांना उद्ध्वस्त करणारी, माणसांचा बळी घेणारी ही कर्जव्यवस्था ....... अरे कसला सहकार हा? कुणी बिघडवला? कुणी नासवला?"(पृष्ठ क्र २२७) असे विचार त्याच्या डोक्यात येतात. त्याला असेही वाटते की हे कुठेतरी थांबले पाहिजे म्हणून तो म्हणतो,(पृष्ठ क्र २२९) " ..... काहीच जमले नाही तरी मी आता घाव घालीनच या विषवृक्षावर किंवा....किंवा हे जंगलच पेटवून देईन......भडकू देत ज्वाळा...... माजू देत हाहा:कार...." कादंबरीच्या शेवटी विश्वनाथ आशावादीच आहे की एक दिवस या योजनेतला भ्रष्टाचार नष्ट होईल आणि सर्वसामान्यांच्या कल्याणाची ही सहकारी योजना त्यांचे कल्याण करेन.

कादंबरीतील नायकाने बघितलेला भ्रष्टचार १९७० पासून तर अगदी अलीकडच्या काळात म्हणजे २००० पर्यंत आणि आजही काही प्रमाणात कायम आहे. त्यामुळे कृषिक्षेत्राचा जो विकास व्हावयास पाहिजे होता त्यामध्ये या क्षेत्रातील भ्रष्टाचारामुळे निश्चितच खीळ बसला. उलट शेतकऱ्याची कर्जाऊ प्रवृत्ती वाढून ते कर्जबाजारी झालेत.' ग्रामीण भागाचा कायापालट घडविण्यासाठी सहकार चळवळ राबविली जात आहे असे आपण म्हणतो. परंतु प्रत्यक्षात तसे घडत आहे का? हा प्रश्न या कादंबरीने उभा केला आहे. आज हा सहकाराचा वृक्ष अमृतवृक्ष राहिला नसून तो विषवृक्ष बनला आहे आणि त्याच्या मुळया समाजजीवनाला उत्तरोत्तर कशा पोखरत निघाल्या आहेत याचा प्रत्यय ही कादंबरी घडवते'.[३] हा रवींद्र ठाकूर यांचा अभिप्राय महत्वपूर्ण वाटतो.

निष्कर्ष :—

ग्रामीण भागतील शेतकरी व त्यावर उपजीविका करणाऱ्या एकंदर ग्रामीणांचा कायापालट करण्याच्या उद्देशाने प्रारंभ झालेल्या सहकार चळवणीने प्रारंभी चांगलेच आशावादी चित्र निर्माण केले. मात्र सहकार क्षेत्रात राजकारणी मंडळींचा शिरकाव होताव ही सहकार चळवळ भ्रष्टाचारामुळे बदनाम झाली. या सहकार क्षेत्राचे मराठी कादंबरीकारांनी फारसे चित्रण आपल्या लेखनातून केलेले नव्हते. मात्र वासुदेव मुलाटेंनी ' विषवृक्षाच्या मुळया ' मधून हे सहकार क्षेत्र त्याच्या फायद्या—तोटयांसह वास्तवरूपात उभे केले आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१) शिंदे संजय, ' वासुदेव मुलाटें : साहित्य आणि समीक्षा, ' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद,२०११ पृष्ठ १३९
२) ठाकूर रवींद्र, ' मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे. व्दि.आ. २००१, पृष्ठ १२२,१२३
३) कोत्तापल्ले नागनाथ, ' विष वृक्षाच्या मुळया ' आवृत्ती दुसरी २००३ मलपृष्ठ.



Scanned with CamScanner

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-34, Vol-01 April to June 2020



Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned with CamSca

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2020
Issue-34, Vol-01

Date of Publication
01 April 2020

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamSca

13) PROTECTION OF WOMEN'S RIGHTS AND WOMEN SAFETY : A LEGAL STUDY
**Satendra Kumar Sharma & Dr. Gaurav Kaushik, Agra** ||69

14) TRANSLATION
**Dr. P. M. SHARMILA, BENGALORE, KARNATAKA** ||82

15) Use of Multimedia package to minimize the problems faced by students...
**Mr. Kailas S. Shinde & Dr. Vaijayanta N. Patil, Nanded** ||87

16) Discrimination against Women
**Dr. Sandeep Kr. Singh, Satyendra S. Chauhan & Dr. Anita Awasthi** ||91

17) At Present, children rights again exploitation
**Rakeshkumar G. Shripateliya & Amrutbhai R. Tirgar, Bhavanagar** ||96

18) मराठी आणि तेलुगु भाषा: अन्योन्यसंबंध
**प्रा.डॉ. वारकड विजय गणपतराव, जि. नांदेड** ||100

19) उत्तर बाल्यावस्थेतील बालकांच्या वर्तन समस्या आणि त्यावरील उपाय
**डॉ. संध्या आयस्कर, बीड** ||105

20) शिरपूर शहरातील अध्यापक विद्यालय व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्र अध्यापकांचा ...
**डॉ. दिपक प्रभाकर बाविस्कर, जि. धुळे** ||107

21) बाबा मोहोड यांच्या बालवाङ्मयातील संस्कारक्षमता
**डॉ. सौ. वैशाली गभणे, भंडारा** ||110

22) ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन
**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे, चिखली** ||116

23) कवी सावरकरांच्या कवितेतील क्रांतिविचार आणि कवी कुसुमाग्रजांचीक्रांतीचा जयजयकार :...
**प्रा.कु. माधुरी शिवचरणजी हटनागर, लाखनी** ||119

24) शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शांतता शिक्षणविषयक मतावलीचा अभ्यास
**प्रा. डॉ. गजानन मुरलीधर खेकाडे, जि. धुळे** ||122

25) सन १८५७ पुर्वीचे महाराष्ट्रातील इंग्रजविरोधी उठाव
**प्रा.डॉ. कदम एस. आर., जि.बीड** ||125

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

22

# ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन

**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे**
शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली

**********

कादंबरी हा मराठी वाङ्‌मयातील अत्यंत लोकप्रिय प्रकार आहे. मराठी कादंबरी ही विविधतेने नटलेली आहे. मराठी कादंबरीच्या साधारणात: दिडशे वर्षाच्या इतिहासात तिच्यात विविध प्रवृती व प्रवाह दिसून आले आहेत. सामाजिक, अदभूत, पौरणिक, ऐतिहासिक या प्रकारांसोबतच पुढे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, अदिवासी अशा विविध रूपात मराठी कादंबरी बहरलेली दिसते. या सर्व प्रकारच्या कादंबऱ्यांमधून तत्कालीन समाजदर्शन आपणांस घडते. साहित्य हा समाजमनाचा आरसा असतो.या न्यायाने जे समाजात आहे तेच साहित्यात प्रतिबिंबित होणार. मराठी कादंबरीतूनही महाराष्ट्रातील समाज,त्यांचे विविध प्रश्न, त्या कालखंडात घडणाऱ्या घटनांचे सुध्दा पडसाद कादंबरीतून उमटलेले दिसतात. प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामीण कादंबरीतून समाजदर्शन कसे घडले आहे हे जाणून घ्यावयाचे आहे.

मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास तो साधारणत: सव्वाशे वर्षाचा आहे. १८८८ साली 'दीनमित्र' नियतकालीतून प्रकाशित झालेली 'बळीबा पाटील' हया कादंबरीस पहिल्या ग्रामीण कादंबरीचा मान दिला जातो. या कादंबरीतून तत्कालीन ग्रामीण जीवन शेतकरी व त्यांच्या समस्या, पाटील, कुळकर्णी, यांची कटकारस्थाने इत्यादीचे दर्शन घडते. त्यानंतर १९०३ मधील 'पिराजी पाटील' ही धनुर्धारी यांची कादंबरीही दुष्काळात सामान्य माणसाची कशी फरफट होते याचे वास्तवदर्शी चित्र टिपतांना दिसते. १९२० पर्यंत ग्रामीण कादंबरी म्हणून केवळ हया दोनच कादंबऱ्या दिसून येतात. मात्र १९२० मध्ये 'खेडयाकडे चला' या गांधीजींच्या हाकेला साहित्यिकांनीही साथ दिली व ग्रामीण जीवनावर लेखनात मोठया प्रमाणात वाढ झाली. 'साहित्यातून ग्रामीण जीवनदर्शन घडविले पाहीले, या जाणीवेने आणि शहरी वाचकांच्या कुतुहल जागृतीसाठी वेगळया वाटा शोधण्याच्या हेतूने हे ग्रामीण जीवनदर्शन घडविण्यास प्रारंभ झाला होता. ग्रामीण कादंबरीचे लेखन याच जावीवेतून होत असल्यास नवल नाही'[१] या वासुदेव मुलाटे यांच्या अभिप्रायावरून तत्कालीन लेखन एका वेगळया हेतून झालेले जाणवते.

त्यानंतर ना.वि.कुळकर्णी, ग.रा.वाळिंबे, वि. वा.हडप इत्यादींनी १९४० पर्यंत ग्रामीण कादंबरीतून शेतकऱ्यांच्या समस्या, जमिनी लाटण्याचे श्रीमंताचे प्रकार, ग्रामीणांमधील अंधश्रध्दा, पोलीस, सावकार, गावगुंड यांचा ग्रामीण माणसांस होणारा त्रास इत्यादींचे दर्शन या कादंबरीकारांनी घडविले आहे.या कादंबरीकारांनी त्यांच्या कादंबऱ्यांमधून समकालीन समाजाचे दर्शन जरी घडविले असले तरी वासुदेव मुलाटे म्हणतात त्याप्रमाणे कादंबरी लेखनाचा हेतू रंजनावादीच होता.

१९४० नंतर र.वा.दिघेसारख्या लेखकांनी लेखनास प्रारंभ केला. त्यांची 'पाणकळा' ही मराठी मातीचा गंध दरवळणारी कादंबरी ठरली. ग्रामीण समाजदर्शनाच्या ते अगदी समीप जाऊन पोहोचले. त्यांनी त्यांच्या इतरही कादंबऱ्यांमधून प्रदेश वैशिष्टयांसह, तिथले समाजदर्शन घडविले, म.भा.भोसले यांच्या 'समरांगण (१९४१),'उघडया जगात'(१९४७),'एका आईची लेकरं'( १९५१) या कादंबऱ्या लिहिल्या.वि. द.चिंदरकर– 'महापूर'(१९४३),ग.ल.ढोकल– 'गावगुंड'(१९४६) बी.रघुनाथ –'बावु दडके' (१९४४), 'म्हणे लढाई संपली'(१९४६),'आडगावचे चौधरी' (१९५४),बा.सी.मर्ढेकर– 'तांबडी माती'(१९४३), 'पाणी'(१९४२), 'विभावरी शिरूरकर' 'बळी'(१९५०), श्री.ना.पेंडसे– 'एल्गार' 'हद्दपार',गारंबीचा बापू','कलंदर', 'रथचक्र', गो.नी.दांडेकर– 'शितू''पडघवली', 'पवनाकाठचा धोंडी' पूर्णमयाची लेकरं','माचीवरला बुधा', व्यंकटेश माडगुळकर– 'पुढचं पाऊल' (१९५०), 'बनगरवाडी'(१९५५) 'वावटळ'(१९६४),



Scanned with CamSca

'करूणाष्टक'(१९६२) इत्यादी. १९४० ते १९६० या दोन दशकात मोठया प्रमाणात ग्रामीण कादंबरी लिहील्या गेली. ग्रामीण भागातील दु:ख, दैन्य, जातीव्यवस्था, अंधश्रध्दा, शेतकरी, मजूर यांची हलाखीची स्थिती इत्यादीचे दर्शन कादंबरीतून घडले.मानवी जीवनातील ताणतणाव, माणसांच्या जाणीवा, त्याच्या मनाला छळणारे अनेक परीचे प्रश्न आणि दु:खगर्भ समस्या यांना लेखनात प्राधान्य देण्यात येऊ लागले.त्यांचे प्रत्ययकारी चित्रण केले जाऊ लागले. आज पर्यंत ज्यांच्या जाणीवांचे चित्रण साहीत्यातून येत नव्हते अशा विविध समाज घटकातील, सामान्यातील सामान्य माणसांचे, उपेक्षितांचे चित्रण त्यांच्या जाणीवांसह होऊ लागले होते. पण ते घडत होते.ते स्वागतार्ह असेच होते.

१९५०—६० या दशकात प्रादेशिक कादंबरीचा एक नवा मानदंड निर्माण झाला आणि तो मानदंड घडविला पेंडसे, दांडेकर आणि माडगुळकर यांनी निसर्गाचे अत्यंत विलोभनीय रूप तेथिल लोकजीवनासह या दशकातील कादंबरीतून व्यक्त झाले. 'जीवनाकडे ती आता अधिक गांभिर्याने पाहु लागली. ग्रामीण वास्तवाकडे केवळ विषयनाविन्याच्या हौसेने न पाहता त्याच्या विविध बाजू आकळू लागली. ते व्यक्त करण्यासाठी मन:पूर्त धडपडू लागली, किंबहुना ती येथे मराठी कादंबरीची मुख्यधारा बनली असून नांगरजीवनाचे चित्रण करणारी कादंबरी काठाशी गेली आहे. तरीही हे मान्य केले पाहिजे की, हे लेखक मध्यमवर्गीय जाणीवां घेऊनच त्या जीवनाकडे वळले आहेत. त्यामुळे ग्रामीण प्रादेशिक जीवनानुभवं अजूनही व्यापक स्वरूपात अविष्कृत व्हावयाचा रहिलाच आहे. १९६० नंतरच्या कादंबरीने ही अपेक्षा पूर्ण केली आहे.'[२]

१९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. महाराष्ट्रमध्ये एक विकासयुग सुरू झाले. अगदी तालुकापातळीवर वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाच्या सुविधा झाल्या. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला, संकरित बी—बियाणे, खते, सिंचनाच्या सोई यामुळे शेती उत्पादनात चांगलीच वाढ झाली मात्र वाढलेल्या उत्पादनामुळे शेतीमालाचे भाव इतर वस्तूंच्या निर्देशांकानुसार कमीच झाले. उत्पादन खर्च मात्र भरमसाठ वाढला. त्यातून उत्पादन खर्चावर आधारित भावासाठी संघर्ष झालेत. सहकार चळवळ वाढली. शेतकरी हिताच्या काही योजना वाढल्या. १९६० नंतरच्या दोन—तीन दशकातील या बदलांमुळे ग्रामीण जीवनात खूप बदल झालेत. १९६० नंतर ग्रमीण भागतून शिकून सवरून आलेल्या लेखकांनी ग्रामीण कादंबरी सामजदर्शनाच्या बाबतीत आधिक वास्तवभिमुख व अधिक प्रगल्भ केली. याबद्दल र.बा.मंचरकर म्हणतात, या नव्या पिढीला ग्रामजीवनाचे पूर्वीच्या साहित्यातील चित्रण अपुरे आणि कृतक वाटू लागले, या असमाधानातूनच हा नवा वाचक स्वत:च लेखनाचा प्रयत्न करू लागला ज्यानी १९६० ते ९० ची कादंबरी घडविली त्यात उध्दव शेळके, रणजित देसाई, शंकर पाटील, आनंद यादव, हमीद दलवाई, रघुनाथ पाटील, रा.र.बोराडे, बाबराव मुसळे, महादेव मोरे, ना.धो.महानोर, वासुदेव मुलाटे इत्यादींनी बदलत जाणाऱ्या समाजाचे दर्शन आपल्या कादंबऱ्यामधुन घडविले आहे. ग्रामीण भागात झालेल्या शिक्षणाचा प्रसार, विज्ञानामुळे आलेली नवनवीन साधने, रस्ते विकास, शासकीय योजना, औद्योगिकीकरण इत्यादींमुळे निर्माण झालेले प्रश्न, बेरोजगारी, स्त्री शिक्षण, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, अनिष्ट रूढी—परंपरा, महागाई इत्यादींचे दर्शन या सर्व लेखकांनी आपापल्या कादंबऱ्यामधून घडविले आहे.

१९९० नंतर संगणकयुगाने जोर धरला. दूरदर्शनच्या माध्यमातून प्रसारमाध्यमे खेडयापर्यंत जाऊन पोहचली. जगातल्या कोणत्याही माणसांशी संभाषण करणे सुलभ झाले. त्यातच नव्वद नंतरच्या दशकात भारताने 'खाऊजा' धोरण स्वीकारले. जागतिकीकरणाच्या प्रभावाने या अफाट वेगाने चालणाऱ्या प्रगतीकडे पाहून सामान्य माणूसच नव्हे तर बुध्दिजीवी वर्गही थक्क झाला. या प्रगतीमुळे शहरे फुगायला लागलीत. एकीकडे अफाट संपन्नता तर दुसरीकडे खेडयापाडयातू दारिद्रयाने गाजलेली विपन्नावस्था यामुळे प्रचंड विषमता वाढीस लागली व ग्रामीण तरून मने खीन्न झाली ग्रामीण तरूण शिक्षण घेऊन याच काळात विनअनुदान शाळेवर शिक्षण म्हणून नोकरी करू लागला त्यात अनेक शिक्षण महर्षींनी ग्रामीण तरूणांना आशेवर ठेऊन त्यांची आयुष्ये उद्ध्वस्त केली. शिक्षण क्षेत्रातील अशी स्थिती, वाढणारी महागाई, रोगराई, कीड, नापिकी, अवर्षण,



Scanned with CamScanner

अशा असंख्य प्रश्नांनी ग्रस्त बनलेला ग्रामीण भाग राजन गवस (भिंगाणा तणकट), तानाजी पाटील (आंभाळ) सदानंद देशमुख (तहान), विश्वास पाटील (झाडाझडती), रंगनाथ पठारे (ताम्रपट), किशोर सानप (पांगुळवाडा), शेषराव मोहिते (असं जगणं तोलांच),गणेश आवटे (पानसळ), सरदार जाधव (कोयता), बाबाराव मुसळे (पखाल), माधव कोंडविलकर (डाळं), बा.बा.कोटंबे (काळरात्र), रमेश अंधारे (पागोरा), प्रतिमा इंगोले (बुढाई), रा.रं.बोराडे (इथं होतं एक गाव), रविंद्र शोभणे (कोंडी) इत्यादी कादंबरकारांनी वास्तवरूपात उभा केला आहे. जागतिकीकरणाच्या झळा अगदी त्याच्या आगमनापासूनच कशा ग्रामीणजनांना लागल्या व त्यामुळे त्यांचे जगणे कसे कठीण होत गेले यासारखे विदारक वास्तव या लेखकांनी त्यांच्या कादंबरीतून उभे केले आहे. 'ऐसे कुणबी भूपाळ' सारख्या कादंबरीतून ग्रामीण कुटुंबातील संघर्ष या बदलेल्या परिस्थितीमुळे कसा वाढला याचे दर्शन घडते. नव्वद नंतरच्या कादंबरीतून धरणग्रस्त वा प्रकल्पग्रस्त यांचे प्रश्न, पाणी प्रश्न, माणसामाणसातील वाढत चाललेले अंतर, शेतीचा आतबट्टयाचा व्यवहार, बदलेले राजकारण, शहरीकरणामुळे बदलेला माणूस व त्याचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम, स्त्री व कामगार यांचे होणारे शोषण, अंधश्रध्दा इत्यादी समाजातील जटील प्रश्नांचे चित्रण कादंबरीतून आले आहे. 'लेखकांच्या लेखनाचा हेतू केवळ मनोरंजनासाठी लेखन हा नसून खऱ्या अर्थाने समाजातील जो घटक आजवर खऱ्या अर्थाने बोलू शकत नव्हता, कादंबरीचा नायकही होऊ शकत नव्हता त्या शेतकऱ्यांच्या ग्रामीणांच्या मनाचा खरा हुकांर या काळातील कादंबरीतून प्रकट झालेला आहे'.[३]

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात यंत्रयुग, संगणक युग, प्रसारमाध्यमे, यांनी एवढा टप्पा गाठला की, अशक्य वाटणाऱ्या गोष्टी अगदी सामान्यांपर्यंत पोहोचल्या, मोबाईल अगदी शेतमजूरांच्या खिशातही खणखणू लागला. घरात टि.व्ही. आला. फ्रिज आला. शहरात नोकरी पेशातील लोकांच्या शॅम्पूसारखा वस्तू खेडयापाडयातून वापरल्या जाऊ लागल्या. शिक्षित तरूणांची संख्या ग्रामीण भागातूनही खूप वाढली. त्यातून प्रचंड स्पर्धा निर्माण झाली. बेकारी मोठया प्रमाणात वाढली. छोटया मोठया राजकीय पक्षांची संख्या मोठया प्रमाणात वाढली.त्यामुळे राजकरणाचे पेव खेडयापाडयापर्यंत फुटलेले दिसते. त्यातूनही गावागावात वैमनस्य वाढीस लागले. जाहिरातींमुळे गरज नसलेल्या वस्तू विकत घ्यायला भाग पाडल्या जाऊ लागल्या. दुसऱ्या बाजुला मात्र व्यापारी वर्गाच्या संगणमताने शेतकऱ्यांच्या शेतमालाचे भाव नियाजनपूर्वक पाडून त्यांची लूट चालविली जात आहे. त्यामुळे एका बाजूला वाढणारी महागाई आणि दुसऱ्या बाजूला शेतमालाला नसणारे भाव या दुष्टचक्रात प्रत्येक ग्रामीण माणूस अडकला आहे. त्यामुळे त्याचे हातात फारच तुटपंजे पैसे दिसू लागले आहेत. दुसऱ्या बाजुला मात्र छोटया मोठया गोष्टीसाठी श्रीमंत लोक लाखो, करोडोंची उधळपट्टी करतांना दिसताहेत. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबून गेला आहे. आत्मसन्मानाचा दुसरा कोणताही मार्ग त्याला सापडत नाही म्हणून तो आज आत्मनाशाचा मार्ग पत्करतो आहे. जागतिकीकरणाचे हे विदारक सत्य समकाळातील कादंबरी मोठया पोटनिडकीने मांडते, शेषराव मोहिते (धुळपेरणी), सदानंद देशमुख (बारोमास), भरत काळे (ऐसे कुणबी भूपाळ), नामदेव कांबळे (सेलझाडा), बाबाराव मुसळे (वारूळ, पाटीलकी), मोहन पाटील (साखर फेरा), अशोक कुळकर्णी (चेअरमन) इत्यादी कादंबऱ्यामधून ग्रामवासियांच्या जगण्या—मरण्याचे प्रश्न या ग्रामीण लेखकांनी त्यांच्या कादंबऱ्यामधून मांडले आहेत.'पांडा' सारख्या कादंबरीतुन आदर्श नायक उभा करण्याचाही प्रयत्न झाला आहे. शेतकऱ्यांनी आत्मबळ हरवलेल्या या काळात संघर्षशील नायक उभे करण्याची जरूरी आहे. तसेच शासन स्तरावरही शेतमालाला हमीभाव देण्याची आवश्यकता आहे. 'भारतभर खेडयापासून वीज पसरली, असे म्हटले जात असले तरी आजही खेडयापाडयातून होणारे भारनियमन चार—चार, पाच—पाच, दिवस खेडूतांना अंधारात बसवित आहे. आरोग्य क्षेत्रात गेलेल्या व्यक्तीला चार तास पुन्हा जिवंत करण्याची शक्ती वैद्यकतज्ञांच्या हाती आली असली तरी आजही वैद्यकीय खर्चावर एक रूपया खर्च गाडीच्या चाकाएवढा वाटावा अशी स्थिती



Scanned with CamScanner

खेडया पाडयातून व तांडयातुन आहे. एकीकडे टेस्टटयुब बेबीसाठी दहा—दहा लाख खर्च होत असला तरी आजही कितीतरी बेबी कुपोषणमुळे आईच्या गर्भातून बाहेर येण्याआधीच दम तोडून मृत्यूमुखी पडत असल्याचे चित्र खेडयापाडयातून नव्हे तर शहरातूनही दिसत आहे. स्वातंत्र्यानंतर आजच्या काळात, अहिंसा, उपोषण, नितिमत्ता, सात्विकता, परोपकार हया बाबींना पूर्णपणे तिलांजलीच मिळाली,असे चित्र समाजातून दिसत असुन आपणही स्वातंत्र्यातील कैदीच आहोत असे चित्र वाटायला लावणारी परिस्थिती गुंड राजकरणी, चोर, व्यापारी, शिक्षण, संस्थाचालक, कारखानदार, आजचे समाजसेवक नेते यांनी निमार्ण करून टाकली आहे'.४ हा शंकर विभुते यांचा एकविसाव्या शतकातील एकंदर समाजस्थितीवर प्रकाश टाकणारा महत्वपूर्ण अभिप्राय आहे.एकविसाव्या शतकातील कादंबरीने समाजातील या वास्तव स्थितीला कवेत घेऊन न्याय मागण्याचा भक्कम प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :—** १९६० पूर्वीच्या मराठी ग्रामीण कादंबरीतून जे समाजदर्शन प्रकट झालेले आहे. त्याला बऱ्याच मर्यादा आहेत. कादंबरी लेखनाचा हेतू केवळ मनोरंजन हा असल्यामुळे व लेखक शहरी असल्यामुळे अस्सल ग्रामीण जीवन कादंबरीतून प्रकटत नाही. मात्र १९६० नंतरची कादंबरी या चित्रणाच्या बाबतीत अगदी ग्रामीण समाजजीवनाच्या जवळ गेलीशी वाटते तर १९९० नंतर व एकविसाव्या शेतकातील कादंबरी मात्र 'जसे आहे तसे' असेच ग्रामीण समाज दर्शन ग्रामीण कादंबरीतून प्रकटते. त्यामुळेच मराठी कादंबरीच्या मुख्य प्रवाहात आज ग्रामीण कादंबरीच पुढे आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) मुलाटे वासुदेव,ग्रामीण वाङमयाचा इतिहास, संपा.चंद्रकुमार नलगे,सुरेश एजन्सी,प्र.आ.१९६६ पृष्ठ १३

२) तत्रैव पृष्ठ ३८.

३) ठाकुर रविंद्र,मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे व्दितीय आवृत्ती २००१, पृष्ठ ११९.

४) विभुते शंकर,'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचालं, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,प्रथमावृत्ती २६ जाने २०१०,पृष्ठ २७६.

**23**

# कवी सावरकरांच्या कवितेतील क्रांतिविचार आणि कवी कुसुमाग्रजांचीक्रांतीचा जयजयकार : एकतौलनिक विश्लेषण

**प्रा.कु. माधुरी शिवचरणजी हटनागर**
समर्थ महाविद्यालय लाखनी
राष्ट्रसंततुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

भारताच्या स्वातंत्र्यलढयातील थोरक्रांतीकारक तथा क्रांतीकारकांचे मुकुटमणी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची कविता ही भारताच्या पारतंत्र्याच्या काळातक्रांतीचा जागरकरणारी कविता असूनत्यांची कविता कधीसरळ-सरळक्रांतीचा उद्घोषकरते, क्रांतीचे रणशिंग फुंकतेतरकधीक्रांतीच्या विचारांचे मनोगत व्यक्त करते. त्यात कधी रोखठोकक्रांतीचे आव्हान असेलतरकधीसूचक आवाहन असते.क्रांतीचे आव्हान आणि आवाहन हे प्रामुख्याने त्यांच्या सागरास, सांत्वन, माझे मृत्यूपत्र, आत्मबल आणि पहिलाहप्ता या कवितेमध्ये विशेषत्वाने दिसून येते.या दृष्टीने त्यांच्यात वर उल्लेखित पाचही कवितांचे स्वतंत्र व वेगळे वैशिष्टये दिसून येते. इंग्लंडमध्ये असतांना आता आपणाला ब्रिटीश पोलीस पकडतील अशी स्थिती निर्माण झाली असतांना त्या परदेशात एकाकी अवस्थेमध्ये ब्रायटनच्या समुद्र किनाऱ्यावर एका दगडांवर जावून बसले असतांना दूरवर क्षितिजाच्याही पलिकडे पसरलेला अनंत, अथांग, सागर आणि त्या समुद्रातून वारंवार किनाऱ्यावर येवून आपटणाऱ्या प्रचंड लाटा आणि पलीकडे दूरवर असलेली आपली भारतमाता तिच्या भेटीची तीव्र आठवण मनाला झाली असतांना सावरकर सागराला अत्यंत काकुळतीने विनंती करतांना दिसतात. ते म्हणतात -

"ने मजसी ने परत मातृभूमीला ।
सागरा प्राण तळमळला !"

काकुळतीनेसागराला मातृभूमीला परत घेवून जाण्याची विनंती करणारे सावरकर सागरासमोर लाचारही नाहीत आणि शरणागतही नाहीत, तरसागरालातूच उलट माझ्या मातृभूमीच्या पायाचा दास आहेस अशी आठवण करून देण्यासाठी म्हणतात-

"भूमातेच्या चरणातलातुज धुतां ।



Scanned with CamScanner

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November -2019

SPECIAL ISSUE-CCIV

# Human Rights Present Scenario and Challenges & Humanities







**Executive Editor:**
Prof. Virag S. Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr. Rajendra S.Korde
Arts, Commerce College,Warwat Bakal ,
Tq.Sangrampur Dist. Buldhana

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ISSN-2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

*Multidisciplinary International E-research Journal*

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

November -2019

Special Issue – CCIV

## Human Rights Present Scenario and Challenges & Humanities

Guest Editor
Dr. Rajendra S.Korde

Chief Editor
Dr.Dhanraj T.Dhangar

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

Global Impact Factor (GIF)

Universal Impact Factor (UIF)

International Impact Factor Services (IIFS)

Indian Citation Index (ICI)

Dictionary of Research Journal Index (DRJI)

2

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | वर्तमान काळात महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता | प्रा. डॉ. नितीन दादाराव गौरखेडे | 110 |
| 24 | भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धोरणांचा मुद्रास्फितीवर होणारा परिणाम | प्रा.हर्षद अरविंद एकबोटे | 112 |
| 25 | मूलभूत हक्क आणि भारतीय संविधान | डॉ. नितीन तुळशिराम कन्नोजवार | 116 |
| 26 | संत परंपरेची फलश्रुती | प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. बन्सोड | 121 |
| 27 | साहित्यातील देशीवाद' गौतम बुध्द, म.फुले, डॉ.आंबेडकर आणि भालचंद्र नेमाडे व इतर | प्रा.प्रतिभा कृष्णराव आंवडकर (थोरात) | 126 |
| 28 | सामाजिक लोकशाहीचे प्रणेते राजर्षी छत्रपती शाहू महाराज | प्रा.डॉ. संजय काळे | 132 |
| 29 | बँकसेवेविषयी ग्राहकांच्या तक्रारी व ग्राहक तक्रार निवारण मंचाकडून मिळालेल्या न्यायाचे अध्ययन | प्रा.डॉ. कु.लीना शरदराव गावंडे | 136 |
| 30 | अण्णाभाऊ साठे | डॉ.माधव सोनेकर | 141 |
| 31 | गजलवेदना एक अभ्यास | डॉ. मनिषा नामदेव बनसोडे, | 148 |
| 32 | भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे दिशादर्शन | प्रा.डॉ.संदिप विठ्ठलराव भुरले | 158 |
| 33 | सम्राट अशोकाचे बौद्ध धर्म प्रसारातील कार्य | प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम | 162 |
| 34 | मानवी हक्क बालश्रमिक : वास्तवता | प्रा.डॉ. सुभाष रा. गुर्जर | 167 |
| 35 | महाविदयालयीन विदयार्थिनींना स्त्रीयांच्या हक्कांबाबत असलेली जाणीव जागृती— एक अभ्यास | डॉ. कविता प्रदीप तोटे | 170 |
| 36 | जलसिंचन प्रकल्पाची आवश्यकता | कु.सोनाली दुधाट/डॉ. एस.बी.आखरे | 175 |
| 37 | भंडारा जिल्हयातील कृषी उत्पादकता एक भौगोलिक अभ्यास | घनश्याम एस.अलोने, दिगांबर आ.पारधी | 180 |
| 38 | आजच्या ग्रामीण पूर्नरचनेकरीता युवक | प्रा.डॉ लखपती वा. गायकवाड | 185 |
| 39 | स्वयंसेवी संघटनेचे मानवी अधिकारात महत्व | प्रा. डॉ. के. आर. पोटदुखे | 188 |
| 40 | व्यापारी बँकांची उत्क्रांती व आर्थिक विकासातील योगदानाचे महत्व | डॉ. नीता धर्माधिकारी | 191 |
| 41 | एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबरीतील कृषिव्यवस्थेतचे चित्रण | डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 194 |
| 42 | नद्यांचे स्त्रीत्व आणि देवत्व : एक अभ्यास | प्रा. डॉ. सायली आचार्य | 200 |
| 43 | विवाह अंतर्गत सहजीवन व कायदा : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. कल्याण मोरे | 205 |
| 44 | रामधारी सिंह दिनकर के काव्य में सामाजिक एवं मानवतावादी चेतना के स्वर | डॉ.श्यामप्रकाश आ. पांडे | 208 |
| 45 | भारतातील विकास-प्रेरित विस्थापन | बालासाहेब व्हि. बोधणे | 212 |
| 46 | प्रदुषण : स्थिती आणि गती | डॉ.अर्चना वाघमारे/डॉ.राम ताटे | 214 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
ISSN : 2348-7143
November 2019

# एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबरीतील कृषिव्यवस्थेतचे चित्रण

डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन महाविद्यालय चिखली,जि.बुलडाणा. पिन नं — ४४३२०१

परिवर्तन हा निसर्गाचा गुणधर्म आहे. ज्या शेतीच्या भरशावर मानव आपली उपजीविका करीत आला त्यामध्ये कालमानानुसार बदल झाले आहेत. भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतकऱ्याला 'बळीराजा' संबोधल्या जाते. ' शेतकरी सुखी तर जग सुखी ' अशी वाक्ये वेळोवेळी कानावर पडतात. परंतु शेतकरी आणि तो सुखी याची कुठेही अनुभूती बघावयास मिळत नाही. कृपीउत्पादन हे सर्वांसाठी जीवनावश्यक आणि प्राथमिक गरजांशी निगडीत आहे, तरिही शेतकरी आणि कृषिव्यवस्थेतील त्याचे इतर सहकारी घटक शोषित, पीडीत उपेक्षित आणि दुर्लक्षितच आहेत. या जगाच्या पोशिंद्याने अलिकडील काळात उत्तमोत्तम शेतीचा ध्यास घेतलेला दिसतो. मात्र तरिही इतरांची भूक भागविणारा शेतकरी व त्याचा सहकारी मजूर अर्धपोटी आणि कर्जबाजारी असल्याचे कटु सत्य अनुभवावयास मिळते.

मराठी साहित्यात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात म.फुलेंनी सर्वप्रथम कृषिव्यवस्थेवर जगणाऱ्यांच्या सुखदुःखांना, हालअपेष्टांना वाचा फोडण्याचे काम केले. परंतु त्यानंतर सव्वाशे—दिडशे वर्षांच्या वाड.मय परंपरेत या पंच्याहत्तर टक्के जनसमुदायाचे व त्याच्या दुःखदैन्याचे वास्तव चित्रण जोरकसपणे मांडल्या गेलेले दिसत नाही. प्रस्तुत शोधनिबंधात फक्त कादंबरी वाड.मयातील कृषिव्यवस्थेच्या चित्रणाचाच आढावा विषयानुरोधाने घेतल्या जाणार आहे.

इस.१९६० नंतर ग्रामीण भागातून शिक्षित झालेल्या तरूण लेखकांनी ग्रामीण कादंबरी वास्तवाभिमुख व प्रगल्भ करण्याचा प्रयत्न केला. याबद्दल र.बा.मंचरकर म्हणतात 'या नव्या पिढीला ग्रामजीवनाचे पूर्वीच्या साहित्यातील चित्रण अपुरे आणि कृतक वाटु लागले.या असमाधानातून हा नवा वाचक स्वतःच लेखनाचा प्रयत्न करू लागला. आपण अनुभवलेले पण साहित्यात न आलेले जीवन नव्याने चित्रित करू लागला.'[१] त्यामध्ये उदधव शेळके, रणजित देसाई, शंकर पाटील, आनंद यादव, हमीद दलवाई, रा.र.बोराडे, बाबराव मुसळे, महादेव मोरे, वासुदेव मुलाटे, विश्वास पाटील, सदानंद देशमुख, रविंद्र शोभणे, तानाजी पाटील, राजन गवस, गणेश आवटे, शेषराव मोहिते इत्यादींसारख्या अनेक लेखकांनी कृषिजन संस्कृतीचे चित्रण आपल्या कादंबऱ्यांमधून केले. साधारणपणे १९८० नंतरच्या कादंबऱ्यातील कृषिव्यवस्थेचे चित्रण अधिक वास्तवाभिमुख झालेले बघावयास मिळते.

१९९० नंतर भारताने स्वीकारलेल्या जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात स्थित्यंतरे होण्यास प्रारंभ झाला. इ.स २००० नंतर जागतिकीकरणाच्या प्रभावाने ग्रामीण समाजात प्रंचड बदल झाला. साहित्यिक हा समकालचा साक्षीदार असतो, त्यामुळे समकाळाचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यातून उमटणे अपरिहार्य असते. ग्रामीण कादंबरीतूनही हे भान जोपसल्या गेले व या काळात कृषिव्यवस्थेत जो बदल झाला. जी आधुनिकता आली त्याचे वास्तव चित्रण समकालीन कादंबरीकारांनी केलेले दिसते. जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर वर—वर पोषक वाटणारा हा विकास कृषिव्यवस्थेसाठी प्रचंड तोटयाचा सौंदा ठरला. इ.स.२००० नंतर खुल्या आयात—निर्यात धोरणात प्रचंड वाढ झाली. सेझ, चंगळवादी वस्तू, जाहिरातबाजी, शेतीचे प्रचंड यांत्रिकीकरण याचा कृषिव्यवस्थेतल्या प्रत्येक घटकांवर अत्यंत विपरीत परिणाम झाला. खते, कीटकनाशके, संकरित बी—बियाणे यांच्या अतिरिक्त वापरामुळे जमिनी नापिक होऊ लागल्या तर दुसरीकडे बहुराष्ट्रीय



Scanned with CamScanner

कंपन्याच्या शेतीक्षेत्राशी निगडीत वस्तूच्या किंमती दरवर्षीच वाढत असल्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला यांत्रिकीकरणामुळे उत्पादन वाढले. मात्र व्यापाऱ्यांच्या व सरकारच्या अन्यायकारक धोरणांमुळे शेतमालाला नगण्य भाव मिळू लागला. महागाई वाढीच्या भितीपोटी राज्यकर्त्यांनी या प्रश्नाकडे गांर्भीयाने बघितले नाही. त्यामुळे व्यापारी, दलाल, अडते यांच्या संगनमताने शेतकऱ्यांचे शोषण मोठयाप्रमाणात वाढले. एकविसाव्या शतकाच्या पहिल्यादशकापासून शेतकऱ्यांचा आत्मसन्मान जणू संपलाच. नाईलाजास्तव हजारो शेतकऱ्यांनी आत्मनाशाचा मार्ग पत्करला. खेडी उदध्वस्त होऊ लागली. शेती केल्यापेक्षा गावालगत, शहरालगत प्लॉट पाडून शेतकऱ्यांनी पैसा उभा केला. शेतीविषयक एक नकारात्मक दृष्टी निर्माण झाली. त्यामुळे पुढची पिढी यातून बाहेर पडावी म्हणून शेतकरी, मजूर यांनी स्वत: उपाशी राहून पुढील पिढीला उच्च शिक्षण दिले. त्यातही राज्यकर्त्यांनी दुकांनासारखी महाविद्यालये उभी करून भरमसाठ फी रूपाने पैसा गोळा केला. शेती सोनंनाणं मोडतोड करून शिकलेली शेतकऱ्यांची मुलं अत्यंत कमी पगारावर एखाद्या कंपनीत किंवा विनाअनुदानित शाळेवर बिनपगारी भविष्यातील अपेक्षेने आजही राबतांना दिसतात. मुलाने नोकरी केल्यास शेतीवरचं निर्भरत्व कमी होईल ही अपेक्षाही धुळीस मिळाली. आज हा तरूण ना धड शेती करू शकत आणि नोकरी ती बिनपगारी अशी शोकांतिका अनेकांच्या वाटयाला आलेली दिसते.

इ.स.२००० नंतर कृषितंत्राज्ञानात प्रचंड प्रगती झाली. बैलाऐवजी सर्व कामे यंत्राव्दारे होऊ लागली, तणनाशकांचा व कीटकनाशकांचा वापर प्रचंड वाढला, सिंचन वाढले, या आधुनिक शेतीमुळे खर्चातही खूप वाढ झाली. शिवनाथ बोरसे म्हणतात.'आधुनिक शेतीत शेतीला आणि शेतकऱ्यांना कर्जबाजारी करणारा एक महत्वाचा घटक म्हणजे पीक सरंक्षणासाठी कराव्या लागणाऱ्या फवारण्या.'[२] यासोबतच रासायनिक खते, बी–बियाणे, डिझेल, वीज, मजुरी इत्यादिंचे वाढलेले दर शेतकऱ्यांना परवडनासे झालेत आणि दुसऱ्या बाजूला राहणीमानाच्या खर्चातही प्रंचड वाढ झाली. सिमेंट कॉक्रीटची घरे, केबल व डिश टि.व्ही, मोबाईल, इंटरनेट , आधुनिक कपडे, चुलीऐवजी गॅस सिलेंडर, मोटार सायकली, या चंगळवादामुळेही उत्पन्न आणि खर्च याचा मेळ बसेनासा झाला. त्यामुळे कर्जबाजीरपणात प्रंचड वाढ होऊन त्यातून शेतकरी आत्महत्यांच्या प्रमाणात मोठीच वाढ झाली. कृषिव्यवस्थेवर गुजरात करणाऱ्या या ६५ टक्के कृषिजन जनसामान्यांच्या जीवनाचे विदारक सत्य एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकात ग्रामीण कादंबरीकारांनी वास्तवरूपात उभे केले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात २००० नंतरच्या कादंबऱ्याचा कृषिअर्थव्यवस्थेतील बदलांच्या चित्रणाच्या अनुषंगाने धावता आढावा घ्यावयाचा आहे. 'धुळपेरणी' (२००१) ही शेषराव मोहिते यांची कादंबरी. प्रस्तुत कादंबरीत शेतीव्यवसायातून कुटुंबाला सुखी करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या तरूणांच्या मनाची व जीवनाची झालेली शेकांतिका तसेच कुटुंबाच्या होणाऱ्या वाटण्या याचे चित्रण आले आहे. कृषी महाविद्यालयाची पदवी घेऊनही प्रत्यक्ष ते ज्ञान शेतीसाठी कसे कुचकामी ठरते हे लेखकांनी 'धुळपेरणी'तुन दाखवून दिले. 'शेती ही काहीही केले तरी आतबटटयाचाच व्यवहार आहे' असे शेषराव मोहिते सांगू इच्छितात.भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ' ही कादंबरी २००१ मध्ये प्रकाशित झाली.'ऐसे कुणबी भूपाळ!दारिद्रयात सर्वकाळ!परि अंतरीचा अहंकार!सांडिता ना ! दैन्य,दारिद्रय,दुःखात सर्वकाळ खितपत पडणारा आणि घमेंडी वृत्तीने ऱ्हासाकडे चाललेला शेतकरी वर्ग योच नेमकेपणाने वर्णन भारत काळे यांनी केले आहे. जागतिकीकरणामुळे वाढलेला चंगळवाद,त्यातून वाढलेला खर्च यामुळे एकत्र कुटुंबातील त्यागाची भावना नष्ट होऊन घराघरात धुसफुस सुरू झाली.शेतकऱ्यांचे हे विदारक वास्तक भरत काळेंनी 'ऐसे कुणबी भूपाळ' मधून मांडले आहे.नामदेव कांबळे यांनी २००१ मध्ये 'सेलझाडा'या कादंबरीतून सुपा आणि गहू या सुतार

ISSN : 2348-7143
November 2019

निपुत्रिक दाम्पत्याची कहाणी सांगितली आहे. तसेच 'पखाल'मधून बाबाराव मुसळेंनी बलुतेदारांची पडझड ज्याप्रमाणे समर्थपणे रंगविली तसा अल्पसा प्रयत्न नामदेव कांबळे यांनी 'सेझाडा'मधून केला आहे. बलूतेदार हे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक होते पण या बदलत्या काळात बलुतेदारी नष्ट होऊ लागल्यामुळे जे दु:ख,दैन्य त्यांच्या वाटयाला आले त्यांचे कादंबरीच्या शेवटच्या भागात नामदेव कांबळेंनी चित्रण केले आहे.

सत्तरीच्या दशकापासून कादंबरीलेखन करणारे रा.रं.बोराडे यांचे कादंबरीलेखन याही काळात सुरूच होते.'इथं होतं एक गांव'(२०००),'मरणदारी'(२००८),'नामदार श्रीमती'(२००७),'रिक्त अतिरिक्त (२००९) इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहील्यास व त्यातून ग्रामीण समश्यांचा शोध घेतला.किल्लारीचा भूकंप, भूकंपजन्य परिस्थिती हाताळणारे भ्रष्ट प्रशासन,त्यातले राजकारण,ऊसाचे प्रश्न,साखर उद्योगातले राजकारण,त्यात गरीब शेतकऱ्यांची झालेली वाताहत असे ज्वलंत प्रश्न त्यांनी कादंबरीतून अधोरेखित केले आहेत.शेतकऱ्यांची होणारी कोंडी आणि शोषण याबाबत 'रिक्त—अतिरिक्त' या कादंबरीबाबतचा डॉ.भास्कर पाटील यांचा अभिप्राय महत्वपूर्ण वाटतो, 'अस्मानी संकटातून सावरत चाललेल्या शेतकऱ्याला 'सुलतानी'संकटे मात्र कशी नेस्तनाभूत करतात, या शक्ती विविध प्रकारे शेतकऱ्यांची कोंडी आणि शोषण करतात, परिणामत:आशेचे सारेच किरण धुसर होऊन या शेतकऱ्याला कसे गतप्राण व्हायची वेळे येते, याचे अत्यंत कारूण्यपूर्ण हदयस्पर्शी आणि चितनात्मक वर्णन रा.रं.बोराडे यांनी 'रिक्त—अतिरिक्त'मध्ये केले आहे.'[३] ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारी मोहन पाटील यांची 'साखरफेरा'ही एक महत्वपूर्ण कादंबरी २००६ मध्ये प्रकाशित झाली. त्यांनी या कादंबरीतून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आगतिकता मांडतांना शेतकऱ्यांमधील वृत्तीजागर अनेक समकालीन संदर्भासह आणि भव्य अवकाशासह मांडला आहे. 'पाडा ही सुध्दा २००६ मधील अशोक कौतिक कोळी याची केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या मांडणारी कादंबरी आहे. त्यांचीच 'कुंधा'(२०११) कादंबरी जागतिकीकरणामुळे ग्रामीण जीवन संस्कृतीची बिघडलेली लय,शोषण संस्कृतीला बळी पडलेली माणसे,निवडणुकीतील राजकारण,झगडे,तंटे, कापसासंबंधीचा देवराव बापूंचा आक्रोश चित्रित करते.

भीमराव वाघचवरे यांची 'गराडा'(२००२)ही कादंबरी शेकऱ्यांच्या जीवनातील भयावह प्रश्न व हालअपेष्टा प्रदर्शित करते. तिचा सविस्तर विचार पुढे केला जाणार आहे.'रानखळगी'ही त्याचीच दुसरी कादंबरी सुध्दा समकालीन शेतकऱ्यांच्या व्यथा प्रकट करते.शेती ही एकतर कमी पाण्यामुळे पिकत नाही आणि पिकली तर जास्तीच्या पावसामुळे मूग, बाजरी कशी हातातून जातात.त्यामुळे आंधनात मिळालेली गाय विकून मुलाच्या शिक्षणाची तजविज करावी लागते, ढोर मेहनत करूनही शेकऱ्यांच्या आर्थिक समस्या वाढतच आहेत हेच त्यांनी या कादंबरीतून सांगितले आहे. एकविसाव्या शतकाच्या सुरवातीस 'झळ' (२००६) ही सतीश जाधव यांची कादंबरी द्राक्ष बागायतदाराच्या समस्यांची मांडणी करते, तसेच त्यानी शेतकऱ्यांच्या दोषांचेही वर्णन केले आहे. म्हणून या कादंबरीत कृषिअर्थव्यवस्थेचे आकलन एकांगी न होता विविध बाजुंनी होते. दिनकर चौधरी यांच्या 'बुझ्र्वागमन'मध्ये केळी,ऊस,कापुस,उत्पादकांच्या व्यथा उजागर होतांना दिसतात. 'बारदाना'ही प्रकाश देशपांडे केजकर यांची कादंबरी शेकऱ्यांच्या हालाखिच्या स्थितीचे वर्णन करून काहीही झाले तरी ग्रामीण माणसांची मुळं अंतिमत: शेतीशीच जोडलेली असतात हे सांगते. सहकार क्षेत्र हे कृषीअर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिने महात्वाचे क्षेत्र, परंतु विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात भ्रष्टाचारामुळे बदनाम झालेल्या या क्षेत्रात एकविसाव्या शतकातही फरक पडला नाही. सहकार क्षेत्रातील लुटीचे राजकारण 'चेअरमन'(२००६) या अशोक कुलकर्णींच्या कादंबरीतून चित्रित होते. विनाअनुदान तत्वावरील शाळांनी ग्रामीण डी.एड.,बी.एड. झालेल्या तरूणांचे आयुष्य कसे ध्वस्त केले,तसेच शिक्षणाचे झालेले बाजारीकरण यामुळे शिक्षण हा विषय



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue
ISSN : 2348-7143
November 2019

ग्रामस्थांसाठी कसा जटील झाला आहे. याचे व या शिक्षण संस्थामधील राजकरणाचे प्रश्न योगीराज वाघमारे यांनी 'शिक्षणनामा'(२००४) या त्यांच्या कादंबरीमधून मांडले आहेत.

ग्रामीण भागात राबवण्यात येणाऱ्याा सर्वच शासकीय योजनांचा खेळ—खंडोबा होतो. शासकीय पैसा योजनांच्या नावे मंजूर होतो, परंतु त्या योजनांमुळे ग्रामस्थांचा सोडून दुसऱ्यांचाच फायदा होतो. 'निशाणी डावा अंगठा' या रमेश इंगळे उत्रादकर यांच्या कादंबरीतून खेडयातील अशिक्षितांच्या हितासाठी, विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रौढ साक्षरता योजनेतील भ्रष्टाचार त्यांनी चव्हाटयावर आणला आहे. ईओ, बीओ, एडीआय, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, ग्रामसेवक व प्राथमिक शिक्षक या साऱ्यांनी मिळून साक्षरता अभियानाचा केलेला बटयाबोळ हा त्यांच्या कादंबरीचा विषय आहे. अशाप्रकारच्या ग्रामीण भागाशी संबंधित योजनांमध्ये दिवसेंदिवस प्रचंड भ्रष्टाचार वाढत आहे. माहितीचा अधिकार प्राप्त होऊनही त्याचा फायदा झाला नाही. म्हणजे जो तो फक्त कृषिव्यस्थेलाच लुटतांना दिसतो आहे. जागतिकीकरणामुळे देशात आलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यासुध्दा खेडयातून उत्पन्नाचे मार्ग शोधत आहेत. यामुळे ग्रामस्थांचे आर्थिक प्रश्न सातत्याने वाढत गेलेले दिसतात. त्यातून एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू झालेले दिसते. सदानंद देशमुखांनी 'बारोमास'(२००३) मधून या नव्या काळातील बदलेल्या परिस्थितीचे प्रश्न चित्रित केले आहे. जागतिकीकरणाचे परिणाम प्रदर्शित करणारी ही एक महत्वपूर्ण कादंबरी आहे.

दलित,पीडितांच्या दुःखाचे, त्यांच्या स्थितीचे चित्रण या काळातील कादंबरीने केले आहे. बाबराव मुसळेंनी 'वारूळ'(२००४) मधून मातंगाच्या वेदनेचे हुकांर टिपले आहेत. गाव,गावकी, परंपरागत जातिसंघर्ष तसेच शिक्षण, राजकारण, पंचवार्षिक योजना, भ्रष्टचार, काळाबाजार इत्यादींचा उहापोह मातंगाची सद्यस्थिती वर्णन करतांना आला आहे. गिरीश प्रभुणे यांनी त्यांच्या 'पारधी'(२००६) कादंबरीत एकविसाव्या शतकातही अनाथग्रस्त जगणे जगणाऱ्या पारधी समाजाच्या आक्रोशाची गाथा मांडली आहे. पारधी समाजातील काही स्त्री—पुरूष शेतावर शेतमजूर म्हणून काम करतात, त्याच्या उत्कर्षाची तळमळ प्रस्तुत कादंबरीतून व्यक्त होते. 'शिलिपशेरा'(२००३) या मधुकर वाकोडे यांच्या कादंबरीतूनही झिंगाभोई या फिरस्त्या जातीचे चित्रण आले आहे. काळ बदलला तरी या समाजाचे प्रश्न जसेच्या तसे आहेत. यासोबतच त्याच्या शिकारीचे, रानातील औषध जमा करून पार पडणाऱ्या उदरनिर्वाहाचे वर्णन त्यांनी 'शिलीपशेरा'तून केले आहे.

राजकीय पक्षांनी गावोगावी आपल्या शाखा स्थापन करून, अनेक नवतरूणांना नावाची पदे देऊन पक्षाच्या विस्तारासाठी त्यांचा वापर मोठया प्रमाणात करून घेतला. जातिनिहाय पक्षांमुळेच समाजात अनेक गट तयार झाले, त्यामुळे आपल्या जातीपुरताच विचार करण्याची प्रवृत्ती वाढली. जातवार संघटना,त्यातील राजकारण,गटबाजी,जातीय तणाव,दलित व सवर्ण या दोहोंचा त्यामध्ये सहभाग यामुळेही ग्रामीण भागाचे फार मोठे नुकसान झाले. ग्रामीण भागाला विकासापासून मागे खेचणाऱ्या ऱ्हासशील राजकारणांचे चित्रण गणेश आवटे यांनी त्यांच्या 'भिरूड'(२००७) कादंबरीतून रेखांकित केले आहे. कादंबरीचा विषय राजकारण असला तरी राजकारणामुळे एकंदर कृषिव्यवस्था कशी भरडून निघते याचे चित्रण गणेश आवरे यांनी केले आहे.

कृष्णा खोत यांनी 'रौंदाळा'(२००५), 'गावठाण'(२००८) या कादंबऱ्यांमध्ये गाव केंद्रस्थानी ठेऊन अलिकडच्या काळातील खेडयातील बदल वास्तवरूपात मांडले आहेत. 'रौंदाळा'तून ग्रामीण भागात विषवेलीप्रमाणे वाढणाऱ्या राजकारणामुळे खेडयांचे कसे नुकसान होते हा विषय येतो. तर 'गावठाण'मध्ये त्यांच्या गावालगतच्या म्हणजे कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा परिसर,तेथील दुर्गम भाग, तेथे राहणारी माणसे, त्यांच्या आर्थिक अडचणी, अन्नाची भूक भागवायची असेल तर या माणसांना गुरांढोरांवर ,बकरी—शेरडांवर अवलंबून रहावे लागते व हीच त्यांची खरी संपत्ती असते.



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
November 2019

त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळे आजच्या आधनिक युगातल्या स्पर्धेत त्यांना सहभागी होता येत नाही. त्यांचे प्रश्न आजच्या काळातही केवळ आर्थिक अडचणींमुळे जसेच्या तसे आहेत, हे त्यांना 'गावठाण'मधून सांगावयाचे आहे. जागतिकीकरणामुळे मुक्त व्यापारानंतर भरतात२००४ नंतर'विशेष आर्थिक क्षेत्र 'सेझ' च्या नावाखाली गोरगरीब, दिनदुबळया, अगोदरच द्रारिद्रयाच्या खाईत खितपत पडलेल्या शेतकऱ्यांच्या जमीनी कायद्याचा बडगा दाखवून शासनाच्या माध्यामातून भांडवलदारांच्या घशात घालण्याचा घाट घातला गेला. हजारो एकर शेती शासनाने कवडीमोल भावात ताब्यात घेतली. अनेक ठिकाणी आंदोलने झाली. परंतु दंडेलशाहीचा वापर करून ती दडपण्यात आली. याच विषयावर शंकर सखाराम यांनी 'एसईझेड' ही कादंबरी २००८ मध्ये लिहीली. स्वत: लेखक 'सेझ'च्याा कायद्यामुळे भरडल्या गेले. स्वत:च सेझग्रस्त असल्यामुळे या महाकाय जटील प्रश्नांचे बारकावे, अनेकविध पैलू, आंदोलने वगैरेचा त्यांना चांगलाच अनुभव होता. त्यामुळे या कादंबरीतून सेझच्या विविध अंगावर त्यांनी प्रकाश टाकला आहे.

' हेळसांड ' (२००९) या किसन पिसे लिखित छोटयाशा कादंबरीतून जागतिकीकरण, सेझ यामुळे शेतकरी कसा कर्जबाजारी झाला याबद्दलचे चिंतन आलेले आहे. गावातील ग्रा.पं. निवडणूकीतील वादामुळे शिवानाना सारख्याा शेतकऱ्यांचा ऊस साखारकारखान्यात मुद्दाम जाऊ दिला जात नाही. बॅकेंचे कर्ज अंगावर असल्यामुळे अधिकारी घरातील वस्तुंवर जप्ती आणतात. शेवटी साखरकारखान्यात ऊस घेतल्या जात नसल्यामुळे त्यांना उभा ऊस पेटवून द्यावा लागतो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची हेळसांड व्यक्त करतांना तो सतत कर्जबाजारी का राहतो याचीही कारणे लेखक कादंबरीतून सांगतात. शेतमालाला योग्य भाव भेटत नाही, कपाशीचे पीक लाल्यासारखा रोग येऊ देत नाही, रासायनिक खते व किटकनाशकांचे दरवर्षी वाढणारे भाव, बोगस बियाणे, विजेचे सोळा—सोळा तास भानियमन, साठ वर्षातील शासनाचे शेतकरी विरोधी धोरणे, खते—बियाणे—औषधी, अवजारे यांच्या कंपन्यांकडून होणारी लूट , सहकारातील भ्रष्टाचार, खाऊजा धोरणानंतर शेतमालाची वाढलेली आयात इत्यादीमुळे शेतकरी सतत कर्जबाजारी राहतो. आतापर्यंत आपलेच लोक शेकऱ्यांना लुटत होते, आता बाहेरच्या देशातील लोकही शासनाच्या परवानगीने शेतकऱ्यांना लुटून राहिले आहेत. शिवानाना म्हणतात." आता तर सेझ आलय शेतकऱ्यांच्या उरावर धडा...धडा...आवाज करीत. आत्तापर्यंत शेतकऱ्यांची महालूट केली. आता शेतकऱ्यांजवळील उरल्या—सुरल्या जमीनी बळकावनं सुरू झालंय सेझच्या नावाखाली".[४] लेखकांनी कादंबरीच्या प्रस्तावनेतही शेतकऱ्यांच्या या हेळसांडीला राज्यकर्तेच जबाबदार आहेत असे म्हटले आहे. 'गेल्या साठ वर्षामध्ये देशात बहुचर्चित हरितक्रांती झाली. सहकार चळवळ आली. आता खाऊजा धोरण आलं... सेझ धोरण आलं. या सगळया धोरणांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची बिजे आहेत. परंतु राजकीय नेते आपल्या अकलेचे तारे तोडत शेतकऱ्यांनाच दोषी धरत आहेत....शेतकरी आळशी आहेत. व्यसनी आहेत, अशाप्रकारे शेतकऱ्यांची टवाळी करतात.विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी बहुचर्चित गाजावाजा करीत कर्जमाफी झाली, तरिसुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत.....एकीकडे देशात इंडिया शायनिंगचे ढोल वाजवले जातात. तर दुसरीकडे देशाचा पोशिंदा जिवंतपणी मरणयातनांचे जीवन जगत आहे. जगात तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येणाऱ्या आपल्या देशामध्ये इंडिया आणि भारत असे दोन भाग झालेले आहेत.'[५] अशाप्रकारे किसन पिसे यांनी 'हेळसांड'मधून एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकाचे विदर्भातील शेतकऱ्याचे विदारक वास्तव चित्रित केले आहे.

रवींद्र शोभणे यांनी 'पांढर'(२००९) या कादंबरीतून जागतिकीकरणाच्या रेटयानं खेडयांचे आधुनिकीकरण होत आहे, पण या संक्रमणामध्ये गावांची अवस्था मात्र उजाड आणि भकास होत चालली आहे. अशाच एका गावची कथा 'पांढर' मध्ये आलेली आहे. २००५ नंतर



Scanned with CamScanner

कृषिअर्थव्यवस्थेचा महत्वाचा कणा समजाला जाणारा शेतकरी वर्ग आर्थिक अडचणींचा सामना करता करता हादरून गेला होता. दुसरा कुठलाही मार्ग सापडत नसल्याने शेवटचा मार्ग म्हणून विदर्भात दरवर्षी शेकडोंनी शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरू झाले. डॉ.प्रतिमा इंगोले यांनी 'आत्मघाताचे दशक'(२००९) ही आत्महत्याग्रस्त भागात प्रत्यक्ष फिरून त्या अनुभवावर आधारित कादंबरी लिहली. विदर्भातील शेतकऱ्यांचे भीषण वास्तव या कादंबरीतून साक्षात प्रत्ययास येते. त्यांचीच 'चौथी बोडखी'(२००९) ही कादंबरी नष्ट होणारी बलूतेदारी आणि खेडयातील शिक्षणाचा बटयाबोळ प्रदर्शित करते. 'सहावी राशाटेक'(२०१३) या कादंबरीतूनही माती आणि माय यातील अतूट संबंध स्पष्ट करतांना कृषिसंस्कतीतील बदलांचे चित्रण आले आहे. 'अन मृगधरा बरसल्या ' ( २०१० ) या वैशाली कोल्हे यांच्या कादंबरीत शेतकरी आत्महत्यांचा या काळातील कळीचा प्रश्न त्यांनी रेखांकित केला आहे.

**निष्कर्ष :—**

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात कृषिअर्थव्यवस्था प्रचंड धोक्यात आली. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधला कृषिक्षेत्राचा वाटा कमालीचा कमी झाला.कृषिक्षेत्र एका प्रचंड घातचक्रात पक्के अडकले. दुसऱ्या बाजुला धर्म आणि धर्मांधता, जातीयवाद, दहशतवाद, चंगळवाद, मूल्यऱ्हास असे अनेक जीवघेणे प्रश्न या काळात समोर आलेत. विज्ञानाची अफाट प्रगती बघून आणि प्रत्यक्ष उपभोगून मनाने अस्वस्थ झालेला माणूस व त्यांचे अंतरंग टिपण्याचे मोठे आव्हान या काळातील कादंबरीकारांसमोर होते. उपरोक्त या एकविसाव्या शतकातील दीड दशकाचा विषयानुरोधाने कादंबरी वाडमयाचा जो धावता आढावा घेतला, त्यावरून कृषिक्षेत्र या काळात ज्या परिस्थितीचा,समस्यांचा सामना करते आहे. विशेषत: शेतकऱ्यांचे जे कंबरकडे या काळात मोडले आहे त्या स्वत:उपाशी असलेल्या जगाच्या पोशिंद्याच्या अनेक समस्या वास्तवरूपात कादंबरीतून चित्रीत झाल्या आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

१) मंचरकर र.बा.'ग्रामीण कादंबरी १९६० ते १९८० आणि नंतर', 'ग्रामीण वाड.मयाचा इतिहास',— संपा. प्रा.चंद्रकुमार नलगे, सरेश एजन्सीज,प्रथमाकृती १९९६,पृष्ठ क्र ३७.

२) बोरसे शिवनाथ,' शेतकऱ्यांच्या समस्या : शोध आणि बोध,' वसुधा प्रकाशन,प्रथमावृत्ती २००५,पृष्ठ क्र ४०.

३) पाटील भास्कर, ' रिक्त अतिरिक्त: ऊस उत्पादक शेतकऱ्यांची भीषण अधोगाथा राष्ट्रीय परिसंवाद—स्मरणिका, रामकृष्ण महा.दारापूर , ऑक्टो २०११, पृष्ठ क्र. १४१.

४) पिसे किसन , 'हेळसांड', वक्रतुंड पब्लिकेशन, कोल्हापूर,डिसें२००९,पृष्ठ मनोगत.

५) तत्रैव, पृष्ठ क्र मनोगत



Scanned with CamSca

ISSN 2394-5303

2019-20
April-20

6

# Printing Area®

Issue-64, Vol-01 April-2020

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned with CamSca

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

April-2020, Issue-64, Vol-01

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

14) The Charismatic Leadership nature of Banngabandhu Sheikh Mujibur ...
**Md. Shah Alam & Dr. Mozammel Haque, Uttar Dinajpur, West Bengal** ||67

15) WOMEN EMPOWERMENT IN INDIA
**Nisarg D. Upadhyay, Patan** ||71

16) Impact of Health education through proper nutrition for sport performance
**Prof. Dr. Nirajsingh F. Yadav, Dist-Nagpur** ||74

17) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या विकासासाठी केलेले योगदान
**सहायक.प्रा. राहुल केदारनाथ बोरसे, जि. औरंगाबाद** ||77

18) राज्याचे राजकारण आणि राज्यपाल
**डॉ. डोंगरे एल. बी., जि. नांदेड** ||80

19) सुधारित नागरिकत्व कायदा आणि भारतीय राजकारण: एक परिक्षण
**प्रा. राजेश कचरु गायकवाड, जि. बीड** ||82

20) 'हाल्या हाल्या दुधू दे' मधील सावकारी पाश व भ्रष्ट सरकारी यंत्रणेचे चित्रण
**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे, चिखली** ||86

21) चिपको आंदोलनातील महिलांचा लढा
**प्रा.डॉ. नीता जगताप, पुणे** ||91

22) भारतीय रिझर्व्ह बँक : इतिहास व कार्य
**प्रा. माणिकराव मा. कवरके, जि. अकोला** ||94

23) मध्ययुगीन कालखंडातील अधिका-याची कार्य प्रणाली
**डॉ. पी. बी. सिरसट, जि. बीड** ||98

24) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण वस्ती आणि लोकसंख्याच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास
**डॉ. एस. व्ही. ताठे, जि. जालना** ||101

25) लोणार परिसरातील मठ, मंदिरे, शिल्प यांचे महत्व व स्थान
**डॉ. सुधाकर एन. वाघ, जालना** ||104

26) आदिवासी भिल्ल समाज आणि त्यांची मौखिक गिते
**डॉ. भास्कर गायकवाड, जि. लातूर** ||107

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned with CamScanner

मुस्लिमविरोधी नाही का असा प्रश्न तज्ञाकडून विचारला जात आहे.

संदर्भग्रंथ सुची:-


१. साधना दि.०४.०१.२०२०

२. सकाळ दि.०१ फेब्रुवारी २०२०

३. दै. लोकसत्ता दि. २२ जानेवारी २०२०

४. दै. लोकसत्ता, दि. २० जानेवारी २०२०

५. सत्याग्रही विचारवंत, फेब्रुवारी २०२०

६. दै. लोकसत्ता दि.२० जानेवारी २०२०

७. साधना दि. ०४ जानेवारी २०२० पे न. ०९

८. लोकसत्ता

९. भारताचे संविधान०५

१०. साप्ताहिक साधना दि. ०४ जानेवारी २०२०, संपादकीय

११. www.google .com ०१ march २०२०, bbc news

१२. सत्याग्रही जानेवारी २०२०. ०८

१३. साधना दि. ११ जानेवारी २०२०. संपादकीय ०५

१४.साधना, ०४ जानेवारी २०२० पा.नं. ०७, पन्नालाल सुराणा


❑❑❑

19

# 'हाल्या हाल्या दुधू दे' मधील सावकारी पाश व भ्रष्ट सरकारी यंत्रणेचे चित्रण


डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे

शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय चिखली


## १) प्रस्ताविक :—

१९७० नंतर कृषिव्यवस्थेतील बदलांची गती गतिमान झाली. रासायनिक खते, संकरीत बी–बियाणे, विषारी औषधे इत्यादींचा वापर बराच वाढला. शासकीय योजना, त्यातील भ्रष्टाचार, इत्यादीमुळे नोकरशाहीचा सामान्य शेतकऱ्यास होणारा जाच वाढला, त्याचप्रमाणे वाढलेली महागाई, मजुरीचे दर इत्यादी बाबींचे या दहा पंधरा वर्षात झालेल्या बदलांचे चित्रण तत्कालीन कादंबरीतून आले आहे. १९८५ मध्ये प्रकाशित झालेल्या बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीतून ही या विषयाचा उहापोह झाला आहे.

१९७० नंतर मोठयांपासून तर छोटया अल्पभूधारक शेतकऱ्यांनी रासायनिक खते, संकरीत बियाणे, विषारी औषधे इत्यादींचा शेतीसाठी स्वीकार केला. त्यामुळे उत्पन्नात वाढ झाली मात्र आधुनिक पध्दतीमुळे शेतीचा खर्च खूप वाढला. कष्ट शेतकऱ्यांचे फायदा मात्र आधुनिक साहित्य निर्माण करणाऱ्या कंपन्यांचा, तसेच उत्पादन वाढल्यामुळे शेतमालाला योग्य भावही मिळेनासा झाला, त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला व त्यांची परवड सुरू झाली.

'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीतून बाबाराव मुसळे यांनी विदर्भातील वाशिम जिल्हयातील खेडेगावच्या अशाच एका शेतकऱ्याची कथा चित्रित केली आहे.



Scanned with CamScanner

१९७०–८० चा काळ सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिकदृष्ट्या प्रचंड उलथापालथीचा काळ होता. त्यात १९७१–७२ मध्ये प्रचंड दुष्काळाचा सामना करतांना 'निसर्गापुढे माणूस म्हणजे पालापाचोळाच' याचा अनुभव सर्वांना आला. त्यातच पुढे आणिबाणीचा काळ सर्वांना सहन करावा लागला. स्वातंत्र्य मिळून ३०–४० वर्ष होत आली तरी इंग्रजांचीच धोरणे शासन राबवित असल्यामुळे सरकारच्या दृष्टीने सर्वसामान्य माणूस म्हणजे किडयामुंग्यांपेक्षाही हीन होत चालला. शासनाने जी धोरणे राबविली ती भांडवलदारांच्या फायद्याची, त्यामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले. कृषिक्षेत्राकडे प्रचंड दुर्लक्ष झाल्यामुळे अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, यांना त्याचा जबर फटका बसला. या वर्गाचे खाण्यापिण्याचे वांधे उभे राहिले. आजारी पडल्यास उपचारही आर्थिक दारिद्रियामुळे मिळेनासे झाले. हे सर्व सामान्य शेतकऱ्यांचे हाल बघूनच बाबराव मुसळे यांनी त्यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' मधून अशा पीडितांचे जगणे उजागर केले. बाबराव आपल्या कादंबरीच्या विषयाबद्दल म्हणतात, 'ग्रामीण जीवन अतिशय गुंतागुंतीचं अन बहुपेडी असते. वरवर सरळ सरळ वागणारा एखादा माणुस अंतर्मनातून किती क्लिष्ट, गुंतागुतीचा असतो: तर वरवर कठोर, धोकादायक वाटणाऱ्या व्यक्ती मात्र खऱ्या अर्थानं निर्मळ अंत:करणाच्या असतात, याची कितीतरी उदाहरणं माझ्या अवतीभोवती होती. अज्ञान, दारिद्रय, लाचारी, उपेक्षा, शोषण, भूख, रूसवे– फुगवे, राग–लोभ, श्रध्दा–अंधश्रध्दा, अनिष्ट चालीरिती, जातीपातीतील संबंध, सोयरे संबंधातील ताणतणव, काळाबाजार, लाचलुचपत, भ्रष्टाचार वशिलेबाजी, शासकीय व सहकारी क्षेत्रांची ग्रामीण जीवनाबाबतची उदासिनता, लहरी निसर्ग, नापिकी, अडते, दलाल, व्यापारी.... कांद्याच्या पापुद्रयाप्रमाणे या आणि यासारख्या कित्येक बारीक मोठया विषयांचे थरावरून थर....एक एक थर हळुवारपणे अलग करतांना हदय पार थरथरून जावं. सामाजिक, राजकीय, कौटुंबिक पातळयांवरचं माणसा–माणसांमधलं सख्य पार रसातळाला गेलेलं. हे आणि असे अनेक विषय माझ्याभोवती रिंगण घालत होते. बाबारावांच्या अशा चिंतनातूनच 'हाल्या हाल्या दुधू दे' ही कादंबरी जन्माला आली.'

१९८५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरी लेखना अगोदर बाबरावांनी कथालेखानातून ग्रामीण वास्तव उभे करण्याचा चांगला प्रयत्न केला. मात्र १९८५ मध्ये 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीने त्यांना साहित्य जगतात मानाचे स्थान प्राप्त करून दिले. त्याची ही कादंबरी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात वळणावरची कादंबरी ठरली. कारण उध्दव शेळकेंच्या 'धग' चा अपवाद वगळता, मुळातच तोपर्यंत वैदर्भीय ग्रामीण जीवनावर वास्तवदर्शी अशी कादंबरी आढळत नाही. म्हणून कृषिअर्थव्यवस्थेतील बदलांचे वास्तव उभे करण्याच्या दृष्टिने ही महत्वाची कादंबरी ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात शेतकऱ्यांना भ्रष्ट सरकारी यंत्रणेचा होणारा त्रास आणि सावकारी पाश याचे कादंबरीतून जे चित्रण आले आहे. त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**२) सावकारी पाशात भरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्याचे चित्रण :–**

शेतकरी हा इथून–तिथून लूटीचाच बळी ठरलेला आहे. यामुळे आर्थिक प्रबळता त्यांच्यात निर्माणच झाली नाही. त्यामूळे त्याला सतत दुसऱ्यासमोर हात पसरून आपले व्यवहार पूर्ण करावे लागले आहेत. 'भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो आणि मरतो' असे म्हटल्या जाते ते १००% – सत्य आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अगदी अलिकडच्या काळापर्यंत सावकार हा घटक ग्रामीण भागात गोचिडासारखा चिकटलेला होता. शेतकऱ्यास सहज कर्ज उपलब्ध होण्याचे ठिकाण म्हणजे सावकार. मात्र सावकारांच्या कचाटप्यात जो अडकला तो नष्टच व्हायचा. इतकी प्रचंड व्याजाची आकारणी सावकाराव्दारे होत असे. सावकारकी विरोधात शासनाने भरपूर कायदे केले; मात्र तरीही गावागावात सावकारांचे प्रस्थ अगदी १९९० पर्यंत आणि आजही काही प्रमाणात दिसते. या सावकारांनी आजवर अनेक शेतकऱ्यांना उद्ध्वस्थ करून देशोधडीस लावले आहे. सावकारी पाशात अशारीतीने भरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्याचे वास्तव चित्रण 'हाल्या हाल्या दुधू दे' मधून आले आहे.

शेतकऱ्याला आपल्या मुलीचे लग्न म्हणजे



Scanned with CamScanner

मोठी लढाईच वाटत असते. ग्रामीण भागात लग्न, जन्म आणि मृत्यू या तीन गोष्टींना खूप महत्त्व. हया तीन ठिकाण भरपूर आप्तनातेवाईक हजर असतात. त्यामुळे लग्नासारखा समारंभ चांगला व्हावा, मुलगी चांगल्या घरात द्यावी हया सहज सुलभ भावना गरीबातल्या गरीब शेतकऱ्यांच्या असतात. त्यासाठी प्रसंगी तो कर्ज काढून, आर्थिक अडचण सहन करून हे पार पाडत असतो. कादंबरीतील न्यानबा सुध्दा याच अपेक्षेपोटी मुलीच्या लग्नासाठी यशवंता सावकाराकडे शेत गहाण ठेवून एका वर्षासाठी खरेदी करून देतो. आलेल्या पैशातून पाच हजार रूपये हुंडा देऊन मुलीचे लग्न करतो. तिथून हा सावकारी शनी न्यानबाच्या घरात शिरतो आणि शेवटी तो न्यानबाला कायमचाच घरातून बाहेर काढतो. न्यायबाने शेतगहाण टाकल्यापासून पुढील सात–आठ महिने म्हणजे मृत्यू होईपर्यंत तो सावकाराच्या दहशतीखाली वावरतो.

शेत सावकाराला खरेदी करून देतांना न्यानबाचा मेव्हना–सोबाचा मामा म्हणतो, "तीन एकर रान त्याहयच्या नावी करून द्या मनतात. मव्हर्ल्या हंगामात जितलं मुद्दल घेतलं तितलं फेडायचं. बाकी याजाच्या बदल्यात त्याहयच्या जवडच्या रानातलं त्यानहयनचं पीक खायाचं. एका वर्साचाच करार" 'पाव्हणा सांगत व्हता सावकाराचा हयो हिशोब ऐकून न्यानबाचे मातर डोळेच पठाडा जाऊ लागले'. (पृष्ठ क्र ३,४)शेत खरेदी देतांना असा त्यांचा व्यवहार ठरतो. खरेदीला लग्नामुळे उशीर होतो. त्यामुळे सावकार न्यानबाने घेतलेल्या पाच हजार रूपयांना दोन महिन्याचे दहा रूपये शेकडयाने व्याज आकारतो आणि खरेदी करून झाल्यानंतर न्यानबाला द्यावयाच्या अडीच हजारातून एक हजार व्याजाचे कपात करून फक्त दीड हजार रूपये न्यानबास देतो. सावकाराचे जे व्याजाचे कपात करून फक्त दीड हजार रूपये न्यानबास देतो. सावकाराचे जे व्याजाचे दर होते ते शेतकऱ्याचे कंबरडे मोडणारे होते. शेत मोजून देतांना सावकार पांडेबुवाला पैसे देऊन मोजणीतही घोळ करून जास्तीचे शेत ताब्यात घेतो. शंकर पाटलाला शेत मोजणीत न्यानबाने आणले व शेत मोजणीस आक्षेप घेतला म्हणून सावकार न्यानबास म्हणतो, "ए न्यानब्या, तू कोणाच्या जोरावर गमजा करतांस ते मी वळखतो ! चाल आण, तुहे पाठीराखे कोणते हायेत ते ! काय माहा हलकं भारी करतात ते पाहयतो मी !" (पृष्ठ क्र १०) पुढे शेत वखरतांना थोडा वखर सावकाराच्या वाटणीत जातो म्हणून सावकाराचे पोरं रंगा आणि याद्या बैलास आणि न्यानबास सुजेपर्यंत मारतात. त्याविरूध्द पोलिसात तक्रात किंवा कैफत करण्याचाही धाक होता. कारण त्यामुळे तो आणखी जास्त डुख धरेल, त्रास देईल अशा दहशतीखाली न्यायबाला वावरावे लागते. पुढे न्यानबाला माहित होते की सावकार न्यानबाच्या शेतात हद्दीतून पेरणी करणार आहे, "मनलं, यंधवा पेरतानी रंगा तुमच्या हद्दीतून पेरणार हाये. मनून मनलं, हो, नाही त उगच त्या दिसाच्यावाणी तुम्ही अडवाय येसाल अन् ते त तसे आडमुठयाच्या पोटचे ! नाहाक तुम्हाले आजूक मारहान करंल."(पृष्ठ क्र ३२) सावकाराचा असा त्रास केवळ न्यानबालाच होता असे नाही. शेजाराच्या शेतावाल्यांना सुध्दा कुणाचे गवत कापतील, कुणाच्या शेतात ढोरचं घालतील, कोणाची बाभुळंच तोडतील, कुणाचा कापूसच वेचून नेतील, निवडणूकीत सावकाराच्या मागे न राहिल्यास कुणावर कसलीतरी आफत आणतील, तयार मालाची सुडीच जाळून टाकतील या अशा त्रासामुळे लोकांमध्ये सावकराविषयीची प्रचंड दहशत होती. त्यामुळे सावकाराविरूध्द कुणी ब्र काढत नव्हते. न्यानबाच्याही शेतातली सावकार बाभूळ तोडून नेतो. एवढेच नव्हे तर सोबाची कर्णफुले गहाळ होतात, तेव्हा न्यानबानेच विकले असे सोबाच्या सासऱ्यास सांगून सोबाच्या संसारातही विष कालवायचे काम सावकार करतो.

बबाराव मुसळेंनी सावकाराच्या दहशतीचे जे चित्रण केले आहे. ते अगदी वास्तव आहे. कारण १९७०–८० पर्यंत असेच सावकार ग्रामीण भागात ठिकठिकाणी होते आणि कमी अधिक प्रमाणात असाच जाच सामान्यांना त्याचा होता. ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी हा जाच पिढयानपिढया सहन करीत आले आहेत. बाबाराव मुसळे याबाबत म्हणतात. 'शोषक शोषित हे जेथे दोन माणसं एकत्र येतात, तिथलं वास्तव असते एकानं दुसऱ्याच्या श्रमाचं, घामाचं, कष्टाचं, सहअस्तित्वांच शोषण करावे ही पुर्वापार चालत आलेली रित आहे. जेथे सगळे व्यवहार कोरडया, भावनशून्य



Scanned with CamScanner

अनीतीतून केले जातात तेथे माणुसकीला, नात्यागोत्याला, सद्भाव–सद्विचाराला, सहाकार्याला सहसंवेदनेला कुठलंच मोल नसते. यशवंत सावकार आणि न्यानबा यांच्यामधील परस्पर संबंध हा या पध्दतीचा काळाकुट्ट, किळसवाणा पडदा आहे'.[२] सावकारांच्या अशा जाचापायी न्यायबाने जरी आत्महत्या केली नाही तरी त्याला झालेली गांजवणूक इतकी टोकाची होती आणि मानसिकदृष्टया त्याचे इतके खच्चीकरण झाले होते की, त्याला कॅन्सर होतो. तेव्हा आर्थिक अडचणींमुळे तो त्यावर उपचारही करू शकत नाही. शेवटी त्यातच त्याचा शेवट होतो. सावकारापायी न्यानबासारखी समाजामध्ये अनेक कुटुंबे उदध्वस्त होत होती त्याचे न्यानबाच्या रूपाने केलेले चित्रण अगदी वास्तव आणि तंतोतंत आहे.

**३) भ्रष्ट सरकारी यंत्रणेच्या दुष्टचक्रात अडकलेला शेतकरी :–**

कृषिअर्थव्यवस्थेच्या विकासात भ्रष्टाचार हा एक मोठा अडथळा आहे. शेतकरी, शेतमजूर यांच्या हिताच्या शासनाच्या ज्या योजना आहेत त्या त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत आणि एखादी पोहोचली तरी त्यासाठी ज्याला लाभ होणार आहे त्याला फार मोठी किंमत मोजावी लागते. बाबाराव मुसळेंनी 'हाल्या हाल्या दुधु दे' मधून या भ्रष्ट सरकारी नोकरदारांचे व त्याच्याकडून भरडल्या जाणाऱ्या शेतकरी, शेतमजुरांचे वास्तव चित्र उभे केले आहे. स्वत: बाबाराव याबद्दल म्हणतात, '१९६५–७० च्या कालखंडात मॅट्रीक बारावी पास होऊन तलाठी, कारकून, ग्रामसेवक झालेल्या या ग्रामीण जीवनाशी संबंध येणाऱ्या नोकरदार माणसांत आपलीच, आपल्याच जागी, जाती–पातीची, माणसं किती भ्रष्टाचारी, हरामखोर, लाचलुचपतखोर असू शकतात, हे प्रभावीपणे या कादंबरीत दाखविले आहे'.[३] शासनतील पुढारी, मंत्री सुध्दा भ्रष्ट नोकरशाही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवणारी, त्यामुळे जेरीस येऊन 'भिक नसली तरी चालेल पण कुत्रे आवर' अशी गत शेतकऱ्याची होऊन जाते. याचे प्रत्यंतर प्रस्तुत कादंबरीतून आलेली आहे.

न्यानबा आपल्या मुलीचे लग्न सावकाराला एक वर्षासाठी शेती खरेदी करून दिल्यानंतर करतो. त्यामुळे पुढील हंगामात पेरणीपाण्यासाठी त्याच्याजवळ पैसा नसतो. तो सोसायटीतून पूर्वीचे कर्ज भरून वाढीव कर्ज घेणार असतो. त्यासाठी सोसायटीच्या कारकुनाची भेट घेऊन त्यास तो म्हणतो, 'पहयला वाटपात नंबर लावा,' मनला पण कारकून 'नाही' मनला. 'नंबर लावायचाच असंल त पंधरा रूपये शेकडयान बक्षीसी घेईन मनला'.न्यानबाले असा दिमाख आला समदे गाढवीचे खाऊजीच, कणगाळीवर मुता मनलं त, त्याचे पण हे लोक पैसे द्या मनतील. कुठीसाबी पैसा खाल्ल्याबिगर कोणी उभं राहु देत नाही. अशी कशी खाव खाव सुटली मनाव याहयले? याहयच्या बापानं कव्हा पैसा पाहयला का न्हाई? तरी बरं झालं भट बामणाच्या पोटचे नाहीत. पहयला जमान्या ते बक्षिसी मांघत, पण अशी उटसुट काहीचीबी द्या मनत नसत. हे त खेडयापाडयाचे, शेतकऱ्याच्या रक्ताचेच असून बी, शेतकऱ्याहयचे कामं पैसा खाल्याबिगर करत नाहीत. (पृष्ठ क्र ०७)असाच तो कारकून, न्यानबाने पूर्वीचे कर्ज पाचशे रूपये भरूनही त्याला पावती देत नाही आणि नवीन कर्जही मंजूर करीत नाही. पुढे वसुलीसाठी जेव्हा दुसरे अधिकारी येतात तेव्हा घरावरील पत्रे काढुन नेण्याची त्यांची तयारी असते. कारण कारकुन न्यानबाचे कर्जाचे पैसे त्याच्या खात्यात भरतच नाही. अशाप्रकारची पिळवणूक गावपातळीवरचे नोकरदार सर्वसामान्य शेतकऱ्यांचे तेव्हाही करीत होते व आजही तेच चालू आहे. पांडेबुवा आणि शेतकरी यांचे कायमच संबंध येतात, पण हा पांडेबुवा म्हणजे तलाठी किती भ्रष्ट असतो हे त्या शेतकऱ्यालाच माहिती असते. न्यानबाला सुध्दा शेतमोजनीत सावकाराकडून तलाठयाने पैसे घेऊन असेच ओरबाडलेले असते. याबद्दल लेखक न्यानबाच्या मनातील विचार सांगतांना म्हणतात, 'सावकारानं वावर मोजायसाठी बलवलेला पांडेबुवा किती लुच्च्या हाये ते समद्या गावालेच माहित हाये. पाच वरसं झाले, त्यो या गावात पांडेपण करायला. त्याच्यानं पर्तेकालेच त्याचा आनभाव व्हता. कोणाले बोटभर कागद लिहून द्यायचा असला तरी, त्यो चार पाच रूपये घेये. सातबाराच्या नकला देयाच्या मनल्या की, एका नकलेलं दहा रूपये असा त्याचा रेट व्हता. कोणाचं वावर मोजायचं मनलं की, ज्याच्याकडून पाचपन्नास जास्तीचे भेटतील त्याच्याकडं मोजता मोजता एखादी तरी साकळी आगाऊ



Scanned with CamScanner

टाकलेच. असा लय इगणाच्या मोजणीत त्यानं घोळ केला व्हता'. (पृष्ठ क ०९) न्यानबाने तलाठयाचा अनुभव शेतमोजणीत व नकला काढतांना घेतलाच होता. श्रीमंत व्यक्तींचे मात्र पैशाच्या जोरावर सर्वच कामे पटापट होतात.गरीब शेतकऱ्याला मात्र अनेक चकरा मारून तलाठी, ग्रामसेवक जेरीस आणतात. सोसायटीतही खताचा ट्रक आला की लगेच संपतो. सर्वसामान्याला 'खत संपले' असे सांगायचे. तेथेच पुढारी, श्रीमंतांना मात्र पाहिजे तेवढा माल मिळतो.

विदर्भातील व्यापारी कापूस खरेदीत शेतकऱ्यांना खूप लुटायचे. मात्र फेडरेशनमुळे व्यापाऱ्यांची लुट थांबली, पण भ्रष्टाचार सुरू झाला. मोठया शेतकऱ्यांबद्दल लेखक लिहितात, 'जे मोठमोठया खटल्यावाले शेतकरी हायतं, त्याहयचं कशान काही अडत नाही. त्याहयचा बुरीचा कापूस एच.फोर. मनून पहयल्या ग्रेडात मुकाटयानं जाते. अन गरीबाचा एच. फोर. ग्रेडर लोकाहयले बुरीसारका वाटते. ते बुरीचा भाव देतात. असंच कुठीसाबी कोणत्या बॅकेंत, आफिसात, कोर्टकचेरीत या मोठयाहयजवडे दामाजी असतात. दामाजी मव्हंर केले की ते कोणालेबी इकत घेतात, त्याहयचे कामं अडू देत नाहीत.' (पृष्ठ क १४०) पोलीस यंत्रणेबाबतही कैफत द्यावयाची म्हटली तर पाचशे ते हजार रूपयाने ते लुटतील, याची प्रचिती सोबाच्या वेळेस न्यानबास येते. सोबाने आत्महत्या केल्यानंतर स्मशानात पोलीस येतात. तेव्हा न्यानबास पोस्टमार्टेम, पोलीसी कारवाई मध्ये चार—पाचशे रूपये खर्च करावे लागतात. या अशा भ्रष्ट व्यवहारामुहे सरकारी काम मोफत होऊ शकते यावरचा न्यानबाचा विश्वास उडाला आहे. न्यायबाची या नोकरदार वर्गाबद्दलची चीड व्यक्त करतांना लेखक लिहितात, 'एन्ही हे नोकरशाहीवाले लयच माजल्यावाणी करायले. मंग त्यो पांडेबुवा असो का सोसायटीचा कारकून असो, ग्रामपंचायताचा ग्रामसेवक असो का कोण्या हापीसचा बाबू असो. समद्याहयलेच कामाआंधी गट्ठया खायाले पाहिजे. काम व्हवो का न व्हवो, पहयले माल लाव! जशी त्याहयच्या मायची भाडच इथिसा जमा करून ठेवली', (पृष्ठ क १९) अशाप्रकारे सर्वसामान्य शेतकरी वर्ग या भ्रष्ट व्यवहाराने पिजून निघत होतो.त्याचेच चित्रण बाबराव मुसळे यांनी वास्तव स्वरूपात केले आहे. त्याबद्दल भास्कर शेळके म्हणतात. 'पांडेबुवा तलाठी, ग्रामसेवक, सोसायटीचा कारकून बेनॉरचे हिवरेसाहेब, बॅकेचे वसूली अधिकारी, पोलिस हे भ्रष्ट प्रशासनव्यवस्थेतील सेवक लेखकाने रेखाटून परिवर्तनकाळातील समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे'.[४]

**निष्कर्ष** :— कृषिव्यवस्थेशी संबंधित सर्वच ठिकाणी नोकरशहांकडून असा भ्रष्टाचार होत असल्यामुळे सावकारकीपायी न्यानबासारखे समाजामध्ये अनेक शेतकरी उद्ध्वस्त होत असल्यामुळे शेतकऱ्यांचा पर्यायाने एकंदर कृषिअर्थव्यवस्थेचा विकास खुंटला. शेतकरी वर्ग या भ्रष्ट व्यवस्थेस कंटाळला, त्यामुळे ती योजनाही नको आणि ती कटकटही नको असे न्यानबा सारख्या शेतकऱ्यास वाटावयास लागले. या भीषण परिस्थितीचे वास्तव चित्र 'हाल्या हाल्या दुधू दे' मधून उमटले आहे.

**संदर्भ ग्रंथ** :—

१) मुसळे बाबाराव, 'तृतीय रत्न, हाल्या हाल्या दुधू दे — एक अभ्यास ' बजाज पब्लिकेशन, अमरावती २०१०, भाग — २, पृष्ठ — ०३.

२) सुर्यवंशी नानासाहेब, ' तृतीय रत्न, हाल्या हाल्या दुधू दे — एक अभ्यास' उ नि. पृष्ठ २५.

३) मुसळे बाबाराव, उ नि, पृष्ठ ०९.

४) शेळके भास्कर,'मराठी प्रादेशिक, कादंबरी स्वरूप आणि विश्लेषण, शब्दालय प्रकाशन, २०१२, पृष्ठ ४१७.

❑❑❑



Scanned with CamSca

One Day Interdisciplinary National E-Conference on

# 'Covid-19' & Its Impact On The Various Factors

26 May 2020 ISBN : 978-81-942797-4-7

• Organised By •

**M.E.S. Arts & Commerce College**

Mehkar, Dist. Buldana 443301 Maharashtra
Affiliated with
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

## E-Souvenir

Impact Of COVID-19 lockdown on the Agricultural Sector



Impact Of COVID-19 lockdown on the Industrial Sector



Corona

Impact Of COVID-19 lockdown on the Service Sector



Impact Of COVID-19 lockdown on the Unorganised Sector



Impact Of COVID-19 lockdown on the Social & other sector



**Dr. G. N. Parihar**
Chief Editor

**Dr. U. S. Kale**
Editor

**Dr. P. A. Joshi**
Editor

**Prof. G. D. Saoji**
Editor

पैनगंगा प्रकाशन

Painganga Prakashan, Aurangabad
paingangaprakashan@gmail.com 9975132211 9850927424

Scanned with CamScanner

One Day Interdisciplinary National E-Conference on

# Covid-19 & Its Impact on the Various Factors

**26 May 2020**

**ISBN - 978-81-942797-4-7**

**Organized By**

M.E.S. Arts & Commerce College
Mehkar, Dist Buldana - 443301 Maharashtra

**Affiliated with**

Sant Gadge Baba Amravati University, Amravati

# E-Souvenir

Chief Editor
**Dr. G.N. Parihar**

Editor
**Dr.U.S. Kale**
**Dr. P.A. Joshi**
**Prof. G.D. Saoji**

पैनगंगा
प्रकाशन

**Painganga Prakashan, Aurangabad**



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | परिणाम<br>**प्रा.जोत्सना श्री.जोशी, कु.सोनाली विनोदराव इंगळे** | |
| 83 | कोविड–१९ चे आर्थिक परिणाम आणि बुट अपची स्थिती<br>**डॉ. नीलम मधुसूदन छंगाणी** | 385 |
| 84 | कोरोना विषाणूचा सामाजिक व इतर क्षेत्रावर होणारा परिणाम<br>**डॉ. राजेश सं. बहूरुपी** | 389 |
| 85 | समकालीन कवींच्या कवितेतील कोरोनाविषयक काव्यसंवेदना : एक शोध<br>**प्रा.डॉ.शोभा रोकडे** | 394 |
| 86 | कोवीड १९ मुळे जागतिक राजकारणावर पडलेला प्रभाव<br>**डॉ.प्रशांत दिवाकर सातपुते** | 400 |
| 87 | टाळेबंदीचा साहित्य क्षेत्रावरील परिणाम<br>**डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे** | 403 |
| 88 | भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा लॉकडाउन चा परिणाम<br>**डॉ.विशाल माणिकराव देशमुख** | 408 |
| 89 | कोविड–१९ आणि त्याचा विविध घटकावर पडलेला प्रभाव–एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. राजु न. ढबाले** | 412 |
| 90 | **कोरोना, कोविंद १९, लॉकडाऊनचा, सामाजिक, आर्थिक परिणाम व भारतीय अर्थ व्यवस्था :– 'एक उपाय व मार्ग!'**<br>**प्रा.डॉ. ज्योत्स्ना पुसाटे** | 416 |
| 91 | **कोरोना : समाज घटकांवरील परिणाम**<br>**डॉ.श्रीकृष्ण पदमणे** | 420 |
| | **UNORGANIZED SECTOR** | |
| 92 | Impact of COVID-19 Lockdown on Betel Leaves Retailers of Akola District<br>**Dr. Mahesh C. Dabre** | 423 |
| 93 | An Overview: Impact of COVID-19 Lockdown on Unorganized Workers<br>**Saurabh P. Gaikwad, Rameshwar S. Devhade** | 429 |
| 94 | Problems of Migrant Tribal Workers of Nandurbar Districts in Lockdown Period.<br>**Dr. G.M.Morey** | 435 |
| 95 | A Review on Impact of COVID-19 Lockdown on the Unorganized Sector<br>**Ravikumar B. Misal, Sudhir S. Mulay** | 440 |
| 96 | The psychological, social and economic impact of COVID-19 on workers of unorganized sector in India<br>**Dr. Harinder Kour** | 444 |
| 97 | Impact of Covid-19 lockdown on the Unorganized Sector<br>**Prof Saurabh Pandharinath Wagare** | 449 |
| 98 | Impact of COVID – 19 Lockdown on Unorganised Sector<br>**Dr.Sonali. P.Kumre** | 453 |
| 99 | Covid- 19 and its Impacts on Labour Work<br>**Prof. Dr. Balkrushna Sakharam Ingle** | 459 |
| 100 | Covid – 19 & its Impact on the Various Factors<br>**Dr. Vibhavari B.Hate** | 461 |
| 101 | A Study on Impact of Covid – 19 on Indian Sector<br>**Dr. Sanjay Jagdeoro Tale** | 465 |
| 102 | A Study of Post-Apocalyptic Fiction in the Shadow of COVID 19 Pandemic<br>**Prof. Sulok Birendrasingh Raghuwanshi** | 468 |




Scanned with CamSca

One Day Interdisciplinary National E-Conference on
**Covid-19 & Its Impact on the Various Factors**
Organized By - M.E.S. Arts & Commerce College Mehkar,
Dist Buldana - 443301 Maharashtra
Date : 26 May 2020 ISBN - 978-81-942797-4-7

# टाळेबंदीचा साहित्य क्षेत्रावरील परिणाम

**डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे**
शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन महाविद्यालय
चिखली,जि.बुलडाणा. पिन नं – ४४३२०१

**प्रस्तावना :–**

चीनमधील वुहान प्रांतात डिसेंबर २०१९ मध्ये प्रथमच नव्यारूपात आढळून आलेला ' कोविड' हा संसर्गजन्य रोग ज्याने संपूर्ण जग आज व्यापले आहे. त्यामुळे जवळपास जगभरातल्या देशांनी टाळेबंदीचा निर्णय घेऊन ' जग हे बंदिशाळा ' या गाण्याची अनुभूती सर्वांना आणून दिली आहे. अर्थात समाज संक्रमणाचा धोका टाळण्यासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे संपूर्ण जग घरात बंदिस्त झाले. हजारो वर्षांपासून पृथ्वीच्या पाठीवर जगत असलेल्या मानव जातीने अलिकडील ५०–६० वर्षांत प्रचंड प्रगती करीत वेगाने जीवनप्रवास केला. प्रत्येक क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली. त्या स्पर्धेत टिकण्यासाठी रात्र दिवस काम, चढाओढ हे नित्याचेच झाले. अशी प्रचंड गतीने फिरणारी चाके कोरानामुळे अचानक थांबली आणि त्यामुळे प्रचंड तारांबळ मानवी जीवनात निर्माण झाली. कोरोनापूर्व मानवी जीवन आणि कोरोना महामारीनंतर चे मानवी जीवन यात प्रचंड फरक असणार आहे. कोरोनामुळे जाहीर करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे (लॉकडाऊन) मानवी जीवनाशी संबंधित सर्वच क्षेत्रे ढवळून निघाली आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा इत्यादी क्षेत्रात यापूर्वी कधी अनुभवले नाहीत असे बदल अल्पावधीत जाणवू लागले आहेत. या बदलांचे बरे–वाईट परिणाम भविष्यात अधिक ठळकपणे दिसतीलच. टाळेबंदीचे विविध क्षेत्रावर जे बरे – वाईट परिणाम झालेत किंवा होणार आहेत यापैकी साहित्य हे क्षेत्र सुध्दा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रस्तुत शोधनिंबधात कोविड– १९ या संक्रमित आजारामुळे जाहिर करण्यात आलेल्या टाळेबंदीचा साहित्याच्या क्षेत्रावर कसा परिणाम होत आहे. हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतामध्ये कोरोना विषाणूचा प्रवेश जानेवारी २०२० मध्ये झाला. पहिला रूग्ण केरळमध्ये आढळला आणि हळूहळू त्याचा प्रसार होऊ लागला. पुढे महानगरांमध्ये सुध्दा रूग्ण दिसू लागले. त्यामुळे मार्च २०२० च्या उत्तरार्धात संपूर्ण भारत लॉकडाऊन करण्यात आला. त्यामुळे १३५ कोटी लोकसंख्या घरात बंदिस्त झाली आणि कोरोना इफेक्टचा अनुभव घेऊ लागली. सार्वजनिक वाहतुक व्यवस्था ठप्प झाली. संकटकाळात शेवटचा आधार मानल्या जाणाऱ्या देविदेवतांची मंदिरे– प्रार्थनास्थळे सुध्दा बंद झालीत, शाळा महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण पारंपारिक पध्दतीने घेणे थांबले, गर्दिचे कार्यक्रम, लग्न सोहळे, यात्रा – जत्रा, नवस इत्यादी पूर्णतः ठप्प झाले. २४ ×७ अहोरात्र सर्वच कोरोनामय चर्चा झडू लागल्यात. दूरदर्शनच्या माध्यामातून विविध वाहिन्यांव्दारे दररोज वाढणाऱ्या कोरोना रूग्णांची संख्या, मृत पावणाऱ्या रूग्णांची संख्या, या आजारावर वैद्यकशास्त्र इतके पुढारलेले असतांनाही कुठलेच औषध उपलब्ध नाही याबद्दलच्या चर्चा यामुळे संपूर्ण जनमानसात एक भीतीचे वातावरण तयार झाले. अनेककांच्या अशा चर्चांमुळे मानसिक त्रास ही होऊ लागला.

टाळेबंदीमुळे कामगार, मजूर यांचे आर्थिक बजेट पूर्णतः कोलमडले आहे. कारण सर्वत्र बंद असल्यामुळे काम नाही म्हणून पैसा नाही. पैसा नाही म्हणून पोटा–पाण्याचे प्रश्न उभे राहिलेत. महानगरामधील परराज्यातील कामगारांचे प्रचंड हाल झालेत. वाहतुक व्यवस्था बंद असल्यामुळे या कठीण काळात घराच्या ओढीने प्रचंड जथ्थ्येच्या जथ्थे डोक्यावर सामानाची बाचके, लेकरं घेऊन शेकडो किलोमीटर पायी प्रवास करणारे मजूर हायवेंनी दिसत आहेत. टाळेबंदीत महिलांवरील हिंसाचारातही वाढझाली आहे. मनिषा गुप्ते या लेखिका याबद्दल म्हणतात, ' शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि लैगिंक हिंसाचार जणू काही शिगेला पोहोचले आहेत, असं चित्र दिसून येत आहे. घराच्या



Scanned with CamSca

 ISBN - 978-81-942797-4-7

चार भिंतीमध्ये किंवा एका खोलीच्या पत्र्याखाली आज महिला आणि मुले आपल्यावर हिंसा करणाऱ्या व्यक्तीसोंबत बंदिस्त झालेली आहेत.'[१] महिलांवरील व मुलांवरील हिंसाचाराच्या घटनात या काळात अचानक वाढझाली. तसेच या काळात अनेकांना महिलांच्या अथक परिश्रमाची शक्ती सुध्दा कळुन आली. हिंदु– मुस्लीम संबंधात कोरानामुळे एक प्रकारचा दुरावा निर्माण झाल्यासारखा वाटतोय. काही खाजगी डॉक्टर्सनी अशा कठीण काळात आपले हॉस्पिटल बंद ठेवलेत त्यामुळे सरकारी दवाखान्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही.

शिक्षण क्षेत्राचा विचार केल्यास महाराष्ट्रात मार्च २०२० च्या माध्यातच महाराष्ट्र सरकारने शाळा महाविद्यालये पूर्णत: बंद केलीत विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा पुढे ढकलाव्या लागल्या. शाळा महाविद्यालयांचे ऑनलाईन वर्ग घरीच सुरू झालेत. मात्र परिक्षेच्या अनिश्चितेमुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंता वाढली. बळीराजाने मात्र त्याचे जगाचे पोशिंदेपण सार्थ ठरविले. अर्थात मोठया बाजारपेठेत माल न पाठविता आल्यामुळे स्थानिक बाजारातच त्याला पडत्या भावत शेतमाल विकावा लागला त्यामुळे त्याचे आर्थिक नुकसान झाले. या लॉकडाऊन काळात सामजाला काही नव्या शब्दांचा परिचय झाला. लॉकडाऊन, आयासोलेशन, क्वारंटिन, सेफ डिस्टन्स, सोशल डिस्टन्सींग, मास्क, व्हायरस, सॅनिटायझर, लिक्वीड सोप, हॅडवॉश हे  शब्दप्रयोग जीवनाचे अविभाज्य घटक झालेत.

टाळेबंदी काळात घरातच बंदिस्त झाल्यामुळे अनेकांनी अनेक प्रकारचे छंदही जोपासलेत. सोशल मिडियातून त्याचा अनुभव सर्वांनीच घेतला आहे. अनेक कलावंतांनी आपल्या सुप्त गुणांना या निमित्ताने वाव दिला. गीत गायन, नृत्य, चित्रकला, पेटीवादन, बासरीवादन असे विविध छंद जोपासले गेलेत. म्हणजेच या लॉकडाऊमुळे मानवी जीवनात टोकाचे बदल झालेत. ते भविष्यातही दिसतीलच. आज प्रत्येक जण संक्रमणाच्या भितीमुळे एकमेकांकडे संशयाच्या दृष्टीने बघतो. आजार होऊ नये म्हणून काळजी घेतो. मानसाला विज्ञानाचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाचे महत्वही कळून चुकले आहे. ' जिथे विज्ञान थांबते तेथपासून अध्यात्म सुरू हाते ' असे म्हणणारे आज धार्मिक स्थळेच लॉकडाऊन असल्यामुळे चूप बसले आहेत. असे अनेकविध परिणाम लॉकडाऊमुळे मानवी जीवनावर झालेले आहेत आणि पुढील काळात ते आणखी ठळक स्वरूपात बघावयास मिळणार आहेत. अनेक नवनवे प्रश्न मानवी जीवनासमोर उभे राहणार आहेत. बदलत्या जागतिक राजकारणामुळे भारतासारख्या देशासमोर नवीन संधी सुध्दा उभ्या राहणार आहेत.

एकंदर मानवी जीवनावर कोरोना या आजाराचा प्रचंड परिणाम झाला आणि नवनवीन परिणाम दिवसागणिक समोर दिसत आहेत. शोधनिबंधासाठी घेतलेला जो विषय आहे, ' टाळेबंदिचा साहित्य क्षेत्रावरील परिणाम ' त्या अनुषांगाने साहित्याचे क्षेत्र सुध्दा या परिणामापासून नामनिराळे राहू  शकत नाही. कारण जे समाजात घडत असते. सामाजाचे जे वर्तमान वास्तव असते त्याचे प्रतिबिंब साहित्यातुन उमटतच असते. त्याचमुळे साहित्याला समाजमनाचा आरसा संबोधल्या जाते. साहित्यिक आपल्या अवती–भोवती घडणाऱ्या घटनांचे वास्तव चित्रण साहित्यातून करित असतात. कोरोना महामारीमुळे कराव्या लागलेल्या लॉकडाऊनच परिणाम जसे जीवनाच्या विविध पातळयांवर दिसू लागले आहेत. तसेच साहित्यातून सुध्दा कोरोनाच्या कथा रंगवल्या जाऊ लागलेल्या बघावयास मिळतात. सद्या लॉकडाऊन सुरूच आहे त्यामुळे लॉकडाऊनमुळे मानवी जीवनासमोर उभे राहिलेले प्रश्न काव्य रूपात तत्काल प्रकट झालेत. वर्तमानपत्रे दरम्यान बरेच दिवस प्रकाशित होणे थांबलेले होते. मात्र सोशल मिडीयांच्या माध्यमातून अनेक कविवर्यांनी आपल्या भावना कवितेच्या रूपाने मांडल्या. काहींनी चारोळयांच्या माध्यमातून कोरोना महामारीमुळे उपस्थित झालेले प्रश्न विनोदी पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न केला. काहींणी छोटे मोठे लेख लिहिलेत त्यामध्ये प्रगत वैद्यकशास्त्रावर प्रश्न उपस्थित केले? काहींनी अखखी पृथ्वी बेचिराख करणारे अणुबॉम्बचे तंत्रज्ञान शोधून काढले मात्र एखाद्या महामारीतून वाचण्यासाठी नवीन शोध लावण्यात माणूस गाफिल राहिला, अशा भावना व्यक्त केल्या.म्हणजे विज्ञानाच्या सहाय्याने मानवाने मरणाची व्यवस्था करून ठेवली मात्र जीवन वाचवण्याच्या संशोधनात ते कुठेतरी कमी पडला. अशा आशयाचे लेखन अनेकांनी केले.

' एक एक पाऊल ' या कवितेत शेख जावेद या कविंनी महानगरामधून आपल्या स्वग्रामी पायी निघालेल्या आणि गावात आल्यानंतर शेजारी पाजारी संशयाच्या नजरेने त्याचेकडे कसे बघतात याचे आणि



Scanned with CamSca

महानगरांमध्ये जीवन जगण्यासाठी गेलेली माणसे आज जीवन वाचवण्यसाठी खेडयाकडे जातांना त्यांची झालेली शोकांतिका त्यांच्या कवितेतून मांडतात.

पायी चालत घर गाठणाऱ्यांना
तुम्ही असे हिणवून नका लाऊ.....
आपल्याच गावातील रहिवासी
त्याला संशयी नजरेने नका पाहु.....

हजार बाराशे किलोमीटर तो
बिचारा तो चालत आला गावी कवी जावेद शेख
वाटेत पडत होता रडत होता दै.देशोन्नती, दि १६ मे २०२०
गावात तरी आपली कदर व्हावी....

घराची वाट धरल्यानंतर रस्त्याने शेवटी वाटेतील गावकरीच मदतीस आल्याचे कवी म्हणतात. जालना–औरंगाबाद रेल्वे रूळाने काही मजूर प्रवासी पायी पराराज्यात आपल्या घराकडे निघालेले असतांना चालता चालता थकल्यामुळे आराम करण्यासाठी थांबतात अचानक झोपा लागतात रेल्वे बंद असतानाही मालगाडी धावत येते आणि मजुरांना चिरडून जाते. अगदी नुकतीच घडलेली ही ताजी घटना जगन सर्जेराव बुरूकुल या कविंनी ' क्रुरकाळ ' या कवितेतून या घटनेची शोकांतिका मांडली आहे.

' सोपं असतं का मैलोनमैल
अंतर कापणं पायपीट करून
हौस थोडीच असते कुणाला कवी.जगन बुरकुल
राहायची घरटे सोडून...... दै.देशोन्नती, दि. १६ मे २०२०

केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी परराज्यातून आलेले मजूर त्यांची स्वप्ने काही बंगले बांधण्याची नसतात. तर केवळ आणि केवळ पोटापाण्याची व्यवस्था एवढीच त्यांची सिमित इच्छा असते, स्वप्न असते. मात्र आज त्यांचे ते साधे स्वप्न सुध्दा रेल्वेरूपी क्रुरकाळाने चिरडून टाकले आहे.

रम्य रम्य दिव्य स्वप्ने
गरिबांना पडत नाहीत चुकून
त्यांची साधी साधी स्वप्ने चुरडण्यासाठी कवी.जगन बुरकुल
रेल्वे रूपी क्रुरकाळ असतो टपून दै.देशोन्नती, दि १६ मे २०२०

नुकत्याच घडलेल्या दुर्घटनेचे चित्रण या कवितेतून कवींनी केले आहे. लॉकडाऊनमुळे सर्वजण घरात बंदिस्त झालेत. शासन प्रशासन ओरडून ओरडून सांगत आहे की विनाकारण बाहेर पडू नका, परंतु तरिही याकडे दुर्लक्ष करून लोक बाहेर पडताहेत त्याच्या परिणामबद्दल जावेद शेख कवी लिहितात.

जिल्हा तर सोडाच माणूस
परराज्यात जाऊन आला
गेला अंत्यसंस्कारात अन
कोरोनाच घेऊन आला.....
संपर्कात आलेल्या लोकांना
चांगलीच बसली असेल धास्ती
अन रिकामं फिरणारांची कवी. जावेद शेख



Scanned with CamSca

आता उतरली असेल मस्ती दै.देशोन्नती, दि १६ मे २०२०

जावेद शेख यांच्या एका कवितेत त्यांनी जणसमान्यांना काळजी घेण्याचा सल्ला दिला ते ' कोरोनाला हरवू या कवितेतून म्हणतात.

बाहेर जातांना आवर्जून
तुम्ही वापर करा मास्क
आयुष्याने आयुष्याशी कवी जावेद शेख
असा खेळू नये हो टाक्स दै.देशोन्नती, दि. १७ मे २०२०

असा सतर्क रहाण्याचा सल्ला त्यांनी दिला कोरोनाला जर हरवायचे असेल तर काही बंधने स्वत: पाळावेच लागतील तरच कोरोनासोबतचे हे युध्द आपण जिंकू कवितेत शेवटी ते म्हणतात.

पहिल्यासारखं जगु आपण
जनमनात लवकर मिरवु
सतर्क राहु नेहमी आपण
आणि या कोरोनाला हरवू..........

कोरोनामुळे ज्या अनेकानेक समस्या मानवी जीवनासमोर निर्माण झाल्या त्या बघुन भोवतालचे वर्तमान वास्तव अनेक नवख्या कविंनी अशा प्रकारे कवितांमधुन उजागार करण्याचा प्रयत्न केला. त्यासोबतच कवितेच्या माध्यामातुन जनजागृतीचाही प्रयत्न झाला आहे.

कवितेसारख्या साहित्य प्रकारातुन वर्तमान वास्तव लगेच प्रतिबिंबित होतांना दिसते. मात्र कथा कादंबरी यासारख्या साहित्य प्रकारातून हे प्रतिबिंब उमटायला थोडा अवधी लागतो. परंतु तरिही काही लघुकथा कोरोना या विषयावर ब्लॉग्ज किंवा वर्तमान प्रत्रातुन किंवा सोशल मिडीयातुन वाचावयास मिळाल्यात. सन्ना मोरे यांची ' मनी वसे ते..'ही लघुकथा याचे उदाहरण सांगता येईल. कोरोनाने अनेकांच्या मनांत प्रचंड भीती दहशत निर्माण केली.श्रीधर आणि शकुंतला यांची ही कथा –मुलगा परदेशात गेलेला घरी दोघेच पती–पत्नी ' वर्क फ्रॉम होम ' मुळे श्रीधर घरूनच ऑफीसचे काम करतो. कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यापासुन जवळपास दोन महिने झाले ती घरातून बाहेर गेलेलीच नव्हती. श्रीधरची ऑनलाईन मिटींग असल्यामुळे शंकुतला पहिल्यांदा भीतभीत आंबे घेण्यासाठी बाहेर पडते. परंतु परत आल्यानंतर ती प्रचंड भ्यालेली असते. आता आपल्याला कोरोना होणार असा तिने ग्रह केलेला असतो .परत आल्या आल्या ती आंघोळ करते. श्रीधरला दूर रहायला सांगते. श्रीधर खूप समजावतो तिला पण तिच्या मनातील कोरोना दुर जात नाही. ती थरथरत असते. चहाचा कपहीधरता येत नाही. एवढी प्रचंड दहशत. ती स्वत:ला खोलीत कोंडून घेते. केवळ १५ मि.साठी बाहेर गेल्याने कोरोना होणे शक्य नाही हे अनेकदा समजावल्यानंतरही तिच्या मनात कोरोनाने घर केलेले असते. मुलाचा फोन आला म्हणून श्रीधर फोन द्यायला तिच्याकडे जातो तेव्हा ' तुम्ही लांब राह माझ्यापासुन मला कोरोना झालायं ' असे ती म्हणते अचानक तिला भोवळ येते. सायंकाळी ताप, खोकला, शिंका येऊ लागतात. डॉक्टरांना बोलावून हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात येते. स्कॅब नमुना तपासणीसाठी पाठविल्या जातो. बारा तासानंतर तिचा अहवाल पॉझिटिव्ह येतो. श्रीधरलाही तपासणीचा सल्ला दिल्या जातो. तेव्हा प्रश्न श्रीधरावाच्या मनात उपस्थित होतो. पंधरा मिनीटांनी घात केला की ' मनी वसे ते स्वप्नी दिसे.'कोरोनामुळे किती प्रचंड मानसिक ताण निर्माण झाला आणि त्यामुळे जीवन जगण्यासाठी जे मानसिक बळ लागते ते अनेकांचे नष्ट झाले. हेच या लघु कथेतून लेखकांनी सांगितले आहे.' विवके संदे या लेखकाची ' गाण्याची कोरोना ' ही कथा विनोदी शैलीतून साकार होते. या कथेत कोरोना ही सुंदर मुलगी कल्पिलेली आहे. त्यातुन विनोद निर्मिती करून कोरोनाच्या ताणतणवातून वाचकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न विवके संदे यांनी केला आहे.



Scanned with CamSca

याशिवाय चारोळी या काव्य प्रकारातूनही अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करित कोरोनाचे परिणामही दाखवून दिले आहेत.

सेना आणि मनसेच ध्येय
कोरोनाने साध्य केले
महाराष्ट्र सोडायला
परप्रांतियांना बाध्य केले.

पुंगी– लुंगीच्या नाऱ्याशिवाय
पाहिजे त्या गोष्टी झाल्या आहेत !
आता मराठी माणसासाठी
त्यांच्या सर्व जागा खुल्या आहेत

सुर्यकांत डोळसे

कोरोनामुळे लाखो परप्रांतीय आपल्या राज्यात निघुन गेल्यामुळे बदललेली परिस्थिती या वात्राटिकेसारख्या चारोळीतून व्यक्त होते. लॉकडाऊन काळात दारूची दुकाने बंद असल्यामुळे तळीरामांची खूप पंचाईत झाली . मात्र जेव्हा दारू दुकाने सुरू झाली तेव्हा अनेकांनी आनंदात यावरही खूप विनोदी चारोळया, कविता लिहिल्या आणि कोरोनाचा ताण हलका करण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्ष :–**

संवेदनशील लेखक, कवींनी कोरोना विषयावर साहित्य सृजनास प्रारंभ केला आहे. साहित्यकारांना लॉकडाऊनमुळे भरपूर वेळ मिळाला त्यामुळे साहितय सृजन हे होणारच जेव्हा मानव जातीवर इतिहास वेळोवेळी जी संकटे आली आहेत. त्या त्या वेळी नवीन साहित्य प्रवाह निर्माण साहित्य प्रवाह निर्माण झाले आहेत. कोरोनामुळेचा लॉकडाऊन साहित्य क्षेत्रामध्ये नवीन संधी घेऊन जन्मास आला आहे. कविता, चारोळी, लघुकथा सारख्या साहित्य प्रकारातून टाळेबंदीमुळे बदलेलल्या परिस्थितीचे प्रतिबिंब प्रथमतः उमटले. कोरोना ही मानवी जीवनावरची फार मोठी आपत्ती आहे. कोरोनाने माणसाचे जीवन येणाऱ्या काळात पूर्णतः बदलणार आहे. टाळेबंदीच्या काळातील अनेकांचीझालेली शोकांतिका हा साहित्य निर्मितीसाठी मोठा आणि अत्यंत महत्वाचा विषय आहे. तुर्त साहित्याच्या या लघु प्रकारातून कोरोना इफेक्ट इतका तितका जाणवत असला तरी दिर्घ कथा, काव्य,कादंबरी, या साहित्य प्रकारातुन येणाऱ्या काळात सकस लेखन होणार हे निश्चित आहे.

**संदर्भ :–**

१) गुप्ते मनिषा ' कोरोनाने आपल्या समोर आरसा धरला ' , साधना साप्ताहिक ०९/०५/२०२० पृष्ठ क्र ४०.
२) मोरे सन्ना, ' मनी वसे ते ..., दै.पुण्यनगरी, दि १७/०५/२०२०.



Scanned with CamSca